



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १३० * नांदेड * रविवार, दि. १७ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# मनोज जरांगे ३० मेपासून पुन्हा आमरण उपोषणाला बसणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा रणशिंग फुंकले आहे. ३० मे पासून मनोज जरांगे पाटील हे आंतरवाली सराटीत पुन्हा आमरण उपोषणाला बसणार आहेत. मराठा आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे बैठक बोलावली होते. यावेळी समर्थकांना संबोधित करताना त्यांनी ही घोषणा केली आहे.



मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आपण अडीच–तीन वर्षापासून लढत आहोत. समाजाच्या पदरात काय पडले? जून महिन्यात ॲडमिशन आहेत. ५८ लाख नोंदी निघाल्या आहेत. सरकार जळतंय, मराठा समाजाला मोठं होऊ द्यायचं नाही ही सरकारची भूमिका आहे. सत्तेशिवाय नाही तर मराठ्यांशिवाय शहाणपण चालत नाही. आपल्या समाजाचा एवढा द्वेष का? भाजपमधल्या मराठ्यांच्या लेकीबाळीला आरक्षण लागणार नाही का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

तसेच पुढे ते म्हणाले की, आपल्याकडे रुपया नाही, पैशावाले आपल्यात येत नाहीत. मी प्रामाणिक आहे. आपल्याला वारंवार लढावं लागणार आहे. मुंबई तुम्ही विचाराने जिवंत केली. मुंबईतील लोक आम्हाला पुन्हा येणार का? म्हणून विचारतात. आता आंदोलन असं करायचं की पुन्हा सरकारला चारी दिशेला काही दिसले नाही पाहिजे. नुसते मराठेच दिसले पाहिजे. मी सरकारला दोष देत नाही. तुम्ही हैदराबादचा जीआर काढला पण तुम्ही का रोखला? अधिकारी प्रमाणपत्र देत नाहीत, त्याला मुख्यमंत्रीच जबाबदार आहेत, असा आरोप देखील मनोज जरांगे पाटील यांनी केला.

मुख्यमंत्री तुम्ही गोरगरिबांची मने जिंका. तुमच्या ५० पिढ्या आल्या तरी मी मराठ्यांना धक्का लावू देणार नाही. त्यांनी मराठवाड्यातील मराठ्यांना प्रमाणपत्रासाठी रोखू नये. आंदोलनाच्या तारखेच्या आता प्रमाणपत्र द्या. ५८ लाख नोंदी सापडल्या त्याचे सर्व प्रमाणपत्र द्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यावेळी अभियान घेऊन प्रमाणपत्र वाटले. तसेच फडणवीसांनी करावे. शिंदे साहेबांनी जसे अभियान घेतले तसे तुम्हीही घ्या, असे आवाहन देखील त्यांनी केले. सातारा संस्थानचा जीआर तुम्ही का काढला नाही. अखंड महाराष्ट्र आमचा आहे. आम्ही आठ महिने दम खाल्ला. मी आता वेळ देऊ शकत नाही. सातारा, कोल्हापूर, औंध संस्थानाचा जीआर काढून त्याची अंमलबजावणी करा. ओबीसींना कसा एका जीआर दिवसात काढला, असे देखील त्यांनी म्हटले.

## मान्सून अंदमान–निकोबारच्या बेटांवर पोहोचला

**मुंबई (प्रतिनिधी)–** नैऋत्य मान्सूनने भारतात अधिकृतरीत्या पाऊल ठेवले असून तो अंदमान आणि निकोबार बेटांवर दाखल झाला आहे. मान्सूनने अंदमान समुद्रासह बंगालच्या उपसागराचा काही भाग व्यापला असून, श्री विजय पुरमसह अंदमान बेटांमध्ये जोरदार पावसाची नोंद झाली आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, सध्या अंदमान परिसरात ताशी ३५ ते ४५ किलोमीटर वेगाने पश्चिमेकडील वारे सक्रिय झाले आहेत. पुढील ३ ते ४ दिवसांत मान्सून आणखी पुढे सरकण्यासाठी अत्यंत अनुकूल आणि पोषक वातावरण निर्माण झाले आहे. आग्नेय अरबी समुद्र आणि पूर्व–मध्य बंगालच्या उपसागरात मान्सूनची प्रगती वेगाने अपेक्षित आहे.

यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. सामान्यत: १ जूनच्या सुमारास पोहोचणारा मान्सून यंदा २६ मे रोजीच केरळ किनारपट्टीवर धडकू शकतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने मान्सूनचा वेग वाढला आहे. यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. त्यामुळे मान्सूनच्या प्रवासात कोणताही मोठा अडथळा येणार नसून तो सुरळीत पुढे सरकणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. तसेच, मान्सून ५ जूनपर्यंत गोव्यात दाखल होण्याची शक्यता असून ६ जूनपर्यंत तो कोकणात पोहोचू शकतो. तसेच ७ जूनपर्यंत पुण्यात मान्सून दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## नीट पेपरफुटीप्रकरणी महाराष्ट्रातून आणखी एक प्राध्यापक अटकेत

### सीबीआयकडून आतापर्यंत ९ जणांना अटक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नीट–युजी २०२६ पेपर लीक प्रकरणी महत्वाची अपडेट समोर आली आहे. सीबीआयकडून आणखी एका मास्टरमाईंडला अटक करण्यात आली आहे. सीबीआयने नीट–युजी २०२६ परीक्षेतील बायोलॉजी प्रश्नपत्रिका लीक प्रकरणातील आणखी एका कथित मास्टरमाईंडचा पर्दाफाश केला आहे. पुण्यातील वरिष्ठ बॉटनी शिक्षिका मनीषा गुरुनाथ मांढरे हिला दिल्लीत अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार, मांढरे या एनटीए कडून नीट–युजी २०२६ परीक्षेसाठी एक्सपर्ट म्हणून नियुक्त करण्यात आल्या होत्या. त्यामुळं त्यांना बॉटनी आणि झूलॉजी प्रश्नपत्रिकांपर्यंत संपूर्ण प्रवेश होता. एप्रिल २०२६ दरम्यान मांढरे यांनी पुण्यातील मनीषा वाघमारेच्या माध्यमातून नीट परीक्षार्थींना संपर्क साधून स्वतःच्या पुण्यातील घरी विशेष कोचिंग क्लासेस घेतल्याचा आरोप आहे. या वर्गांमध्ये त्यांनी बॉटनी आणि झूलॉजी विषयातील प्रश्न विद्यार्थ्यांना सांगितले, वहीत लिहून घेतले तसेच पुस्तकांमध्ये मार्क करण्यास सांगितले. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, यातील बहुतांश प्रश्न ३ मे २०२६ रोजी झालेल्या नीट–युजी परीक्षेतील प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेशी जुळले.

दरम्यान, गेल्या २४ तासांत सीबीआयने देशभरातील ६ ठिकाणी छापेमारी करून महत्त्वाची कागदपत्रे, लॅपटॉप, बँक स्टेटमेंट्स आणि मोबाईल फोन जप्त केले आहेत. जप्त साहित्याची सविस्तर तपासणी सुरू आहे. शिक्षण मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाच्या तक्रारीवरून सीबीआयने १२ मे २०२६ रोजी या प्रकरणात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर विशेष पथके स्थापन करून देशभरात शोधमोहीम आणि चौकशी सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणात आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर येथून एकूण ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी ५ आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून, इतर दोन आरोपींना पुणे न्यायालयातून ट्रान्झिट रिमांड घेऊन दिल्लीत नेण्यात आले आहे.

## १ जूनपासून समुद्रात मासेमारीला 'ब्रेक'

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाने यंदाही पावसाळी मासेमारी बंदी लागू केली आहे. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अन्वये १ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राज्याच्या क्षेत्रीय सागरी जलधी क्षेत्रात यंत्रचलित आणि यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. सलग ६१ दिवस लागू राहणाऱ्या या बंदीचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) सा.वि. कुवेसकर यांनी केले आहे.

## नीट परीक्षा रद्द झाल्याचा धसका, नैराश्याच्या भरात तीन विद्यार्थ्यांची आत्महत्या

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नीट परीक्षा रद्द आणि पुनर्परीक्षेचा धसका घेऊन देशात वेगवेगळ्या ठिकाणी तीन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

देशभरात ३ मे रोजी घेण्यात आलेल्या वैद्यकीय प्रवेश पूर्व परीक्षेचा पेपर परीक्षेपूर्वीच फुटल्याने परीक्षा घेणाऱ्या एनटीएने ही परीक्षाच रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. खरंतर भविष्यात डॉक्टर बनण्याचं स्वप्न उराशी घेऊन दोन वर्ष किंबहुना त्याहून अधिक वर्ष रात्रंदिवस मेहनत घेऊन विद्यार्थी अभ्यास करतात. मात्र, या अशा महत्त्वपूर्ण परीक्षेचा पेपर फुटल्याने ही परीक्षाच त्यानंतर




रद्द करण्यात आली. यामुळे देशभरात ही परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांमध्ये तणावाचं व नैराश्याच वातावरण निर्माण झालं आहे. अनेक ठिकाणी या निर्णयाविरोधात आंदोलनही झालीत. मात्र, विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करत एनटीएने ही परीक्षाच रद्द केली.

याच नैराश्यातून उत्तर पश्चिम दिल्लीतील आदर्श नगर परिसरातील नुकतीच नीटची परीक्षा दिलेल्या एका २१ वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केली आहे. या विद्यार्थिनीने यावेळेस या परीक्षेत चांगले मार्क्स मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. तर दुसरीकडे राजस्थानच्या सिकर मधील एका २२ वर्षीय प्रदीप मेघवाल या विद्यार्थ्याने आत्महत्या केली आहे. प्रदीपने यापूर्वी दोन वेळेस ही परीक्षा दिली होती. मात्र, यावेळी त्याने या परीक्षेत ६५० मार्क मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. तर गोवा राज्यातीलही एका १८ वर्षीय विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे.

नीट पेपरफुटीनंतर लातूरमध्ये सीबीआयचं धाडसत्र सुरूच आहे. नीट पेपर लीक प्रकरणात एका खासगी ट्युशन चालकाच्या संबंधित संस्थांवर पुण्यातील हडपसर आणि पिंपरी–चिंचवड परिसरातीलही सीबीआयने धाडी टाकल्या. सीबीआयच्या पथकाने संबंधित ठिकाणी जवळपास एक ते दीड तास तपास करत कागदपत्रे आणि इतर महत्त्वाची माहिती पडताळून पाहिली. सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णीला अटक केल्यानंतर आता सुतमील परिसरातील एका खाजगी ट्युशन चालकाच्या घरी सीबीआयच्या पथकाने छापा टाकला आहे.

## राज्यात कुठे पाऊस तर कुठे उष्णतेत वाढ; ११ जिल्ह्यांना येलो अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील हवामानात मोठा बदल पाहायला मिळणार असून राज्यातील विविध भागांसाठी हवामान विभागाने वेगवेगळे इशारे जारी केले आहेत. राज्यातील ११ जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

यामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सोलापूर, बीड, लातूर आणि धाराशिव या सात जिल्ह्यांसाठी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी वारे, मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तर अकोला, अमरावती, नागपूर आणि वर्धा या चार जिल्ह्यांसाठी उष्णतेचा येलो अलर्ट कायम ठेवण्यात आला आहे.

मराठवाड्यातील बीड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटासह जोरदार वारे वाहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये अलर्ट नसला तरी हवामान विभागाने हलक्या पावसाची शक्यता वर्तवली आहे.

कोकण विभागातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये वातावरणात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. किनारपट्टी भागात ढगाळ वातावरण निर्माण होऊन तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळू शकतात. काही भागात वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने मच्छीमारांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नीट परीक्षाः धर्मेंद्र प्रधान यांना तात्काळ पदावरून हटवा, राहुल गांधींची मागणी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नीट परीक्षेच्या पेपरफुटीच्या प्रकरणावरून सध्या देशभरात मोठा गदारोळ सुरू आहे. नीटच्या परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे हजारो विद्यार्थी संताप व्यक्त करत आहेत. नीट परीक्षेच्या पेपरफुटीमुळे ही परीक्षा रद्द करून आता पुन्हा परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रद्द झालेली नीटची परीक्षा आता २१ जून रोजी पुन्हा होणार आहे.

देशभरात गाजत असलेल्या 'नीट' परीक्षेच्या पेपरफुटीच्या प्रकरणात सीबीआयकडून मोठी कारवाई करण्यात येत आहे. या प्रकरणात आतापर्यंत अनेक संशयितांना सीबीआयने अटक केलं असून पुढील कारवाई सुरू आहे. नीट परीक्षा पेपरफुटीच्या प्रकरणावरून विरोधकांनी केंद्र सरकारवर जोरदार टीकेची झोड उठवली आहे.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नीट पेपरफुटी प्रकरणावरून मोदी सरकारवर टीका केली. तसेच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना त्यांच्या पदावरून तात्काळ हटवण्याची मागणी केली. राहुल गांधी म्हणाले की, नीटची परीक्षा देणाऱ्या २२ लाख विद्यार्थ्यांचा विश्वासघात झाला आहे. तरीही पंतप्रधान मोदी याबाबत एक शब्दही बोलायला तयार नाहीत. धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून तात्काळ हटवा, नाही तर स्वतः तरी जबाबदारी घ्या, अशी मागणी राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांच्याकडे केली आहे.

## भाजप महानगरचे आजपासून दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण अभियान

### ✦ सेव्हन सीज रिसोर्टमध्ये होणार शिबीर
### ✦ खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पार्टी महानगरच्या वतीने शहरालगत असलेल्या पिंपळगाव महादेव येथील सेव्हन सीज रिसार्ट (अनुसया गार्डनच्या बाजूला) येथे रविवार, दि. १७ व सोमवार, दि.१८ मे रोजी दोनदिवसीय निवासी पं. दीनदयाल उपाध्याय जिल्हा प्रशिक्षण अभियान आयोजित करण्यात आले आहे. या अभियानाचे उद्घाटन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे अशी माहिती भाजपा महानगरचे अध्यक्ष विधान परिषदेचे माजी गटनेते अमरनाथ राजूरकर यांनी दिली.

या दोन दिवसीय निवासी शिबिरात विविध विषयांवरील एकूण अकरा सत्रे असून, यात पक्षाचे नेते, प्रमुख पदाधिकारी मार्गदर्शन करणार आहेत पं. दीनदयाल उपाध्याय जिल्हा प्रशिक्षण अभियानाची नोंदणी रविवारी सकाळी नऊ ते १० नोंदणी, १० वाजता राज्यसभा खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन, त्यानंतर ११ ते १२ पहिले सत्र होईल. यामध्ये खा. अशोकराव चव्हाण हे 'कार्यकर्ता विकास संभाल और अपेक्षाएं' या विषयावर मार्गदर्शन करणार असून, अध्यक्षस्थानी नांदेड भाजपाचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पांडे राहतील. दुसऱ्या सत्रामध्ये १२ ते एक या वेळेत 'व्यावहारिक' या विषयावर भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्राताई वाघ या मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेत्या आरती पुरंदरे–साले असतील. दुपारी दोन ते तीन या वेळेत तिसरे सत्र होणार असून, त्यामध्ये 'कार्य विस्तार' या विषयावर माजी केंद्रीय राज्य मंत्री डॉ. भागवत कराड मार्गदर्शन करतील. या सत्राच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे ज्येष्ठ नेते नंदकुमार कुलकर्णी राहणार आहेत.


दुपारी तीन ते चार चौथे सत्र होईल. यामध्ये 'प्रदेश के समक्ष चुनीतियां–राजनीतिक एवं सामाजिकट' या विषयावर पं. दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियानचे मराठवाडा सहसंयोजक मनोज पांगरकर मार्गदर्शन करणार असून, अध्यक्षस्थानी नांदेड भाजपाचे माजी अध्यक्ष अरविंद भारतीया राहतील. चार ते पाच या वेळेत होणाऱ्या पाचव्या सत्रामध्ये माजी जिल्हाध्यक्ष (अमरावती) किरण पातुरकर हे 'विचार परिवार' या विषयावर बोलतील. अध्यक्षस्थानी भाजपाचे ज्येष्ठ नेते रामराव केंद्रे असतील. पाच ते सहा या वेळेत सहावे सत्र होईल. **(पान ३ वर...)**

## नांदेडहून हिंगोलीमार्गे मुंबईसाठी मंगळवारपासून नवीन साप्ताहिक एक्सप्रेस गाड्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांच्या सोयीसाठी हजूर साहिब नांदेड - लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) दरम्यान नवीन साप्ताहिक एक्सप्रेस गाड्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. रेल्वे बोर्डाच्या मान्यतेनंतर गाडी क्रमांक १७६६५/१७६६६ तसेच १७६६७/१७६६८ या दोन साप्ताहिक एक्सप्रेस गाड्या पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला मार्गे धावणार आहेत.

या सेवेंतर्गत उद्घाटन विशेष एकमार्गी विशेष गाडी क्रमांक ०७६६७ नांदेड–लोकमान्य टिळक टर्मिनस ही १९ मे २०२६ रोजी नांदेड येथून सायंकाळी १६.०० वाजता सुटेल व पुढील दिवशी सकाळी ७.५० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. ही गाडी पूर्णा (१७.१०), बसमत (१७.३२), हिंगोली (१८.४२), वाशीम (१९.३०), अकोला (२१.१५), भुसावळ (२३.१०), मनमाड (०१.२२), नाशिक रोड (०३.४२) आणि कल्याण (०६.५५) मार्गे धावेल.

गाडी क्रमांक १७६६७ नांदेड–लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस : २० मे २०२६ पासून प्रत्येक बुधवारी रात्री २१.१५ वाजता सुटेल व पुढील दिवशी १३.०० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. ही गाडी पूर्णा (२२.१५), बसमत (२३.१५), हिंगोली (००.२५), वाशीम (०१.१५), अकोला (०३.४५), भुसावळ (०५.४०), मनमाड (०८.१२), नाशिक रोड (०९.१५) आणि कल्याण (१२.०४) मार्गे धावेल. **(पान ३ वर...)**




## सीबीएसई विद्यार्थ्यांसाठी मोठा निर्णय; नववी–दहावीला ३ भाषा अनिवार्य

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने शालेय शिक्षणातील भाषा धोरणात मोठा बदल केला आहे. आता २०२६–२७ या शैक्षणिक वर्षापासून नववीच्या विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकणे अनिवार्य करण्यात आले आहे. हा नवा नियम १ जुलै २०२६ पासून देशभरातील सर्व सीबीएसई शाळांमध्ये लागू होणार आहे. मात्र, दिलासा देणारी बाब म्हणजे तिसऱ्या भाषेचा दहावीच्या बोर्ड परीक्षेत स्वतंत्र पेपर घेतला जाणार नाही.



राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत बहुभाषिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना भारतीय भाषांशी जोडणे आणि त्यांची भाषिक कौशल्ये विकसित करणे हे यामागील प्रमुख उद्दिष्ट आहे. यामुळे विद्यार्थ्यांची मातृभाषा आणि प्रादेशिक भाषांशी जवळीक वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नव्या व्यवस्थेनुसार विद्यार्थ्यांना आर–१, आर–२ आणि आर–३ अशा तीन भाषा शिकाव्या लागतील. यातील किमान दोन भाषा भारतीय असणे बंधनकारक आहे. एखाद्या विद्यार्थ्याला विदेशी भाषा शिकायची असल्यास ती फक्त तिसरी भाषा म्हणून निवडता येईल, तेही पहिल्या दोन भाषा भारतीय असल्यास. तसेच विदेशी भाषा अतिरिक्त चौथ्या विषयाच्या रूपातही घेता येणार आहे. त्यामुळे हिंदी, संस्कृत, मराठी, तमिळ, तेलुगू, बंगाली, पंजाबी यांसारख्या भारतीय भाषांचा अभ्यास अधिक महत्त्वाचा ठरणार आहे.

## चांदीच्या आयातीवर नवे निर्बंध; चांदीच्या आयातीसाठी आता परवानगी बंधनकारक, केंद्र सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पश्चिम आशियात निर्माण झालेल्या तणावाचा जगावर मोठा परिणाम होत असल्याचं पाहायला मिळत आहे. अमेरिका–इराण युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीमधून होणाऱ्या जागतिक व्यापारात अडथळे निर्माण होत असल्याने अनेक देशांत इंधन पुरवठ्याची साखळी विस्कळीत होत आहे. याचा फटका भारतालाही बसण्याची शक्यता असल्याने आता केंद्र सरकारने उपाययोजना राबवायला सुरूवात केली. या अनुषंगानेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वीच देशवासियांना काटकसरीच्या उपाययोजना स्वीकारण्याचं आवाहन केलं होतं.




त्यानंतर केंद्र सरकारने सोने–चांदीवरील आयात शुल्क १५ टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे सोने–चांदी खरेदी करणाऱ्यांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात असतानाच आता केंद्र सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने चांदीच्या आयातीवर नवीन निर्बंध लागू केले आहेत.

केंद्र सरकारच्या नव्या निर्णयानुसार, आता चांदीच्या अनेक प्रकारांना फ्री आयात धोरणातून काढून टाकण्यात आलं असून मर्यादित आयात श्रेणीत टाकण्यात आलं आहे. त्यामुळे परदेशातून चांदीच्या आयातीसाठी आता सरकारची परवानगी लागणार आहे, म्हणजेच सरकारने चांदीच्या आयातीवरील निर्बंध वाढवले आहेत.

केंद्र सरकारने सोन्यापाठोपाठ चांदीच्या आयातीवर नवीन निर्बंध लादले आहेत. चांदीचा आता 'मुक्त' आयात धोरण प्रणालीतून 'प्रतिबंधित' आयात धोरण प्रणालीमध्ये समाविष्ट केलं आहे. अनावश्यक आयातीवर अंकुश ठेवून परकीय चलनाचा होणारे निर्गमन नियंत्रित करण्यासाठी ही वाढ करण्यात आली. सुधारित नियमांनुसार, ९९.९ टक्के शुद्धता असलेल्या चांदीच्या लगडी, तसेच नैसर्गिक चांदी, अर्ध–प्रक्रिया केलेली चांदी आणि पावडर स्वरूपातील चांदीच्या आयातीसाठी आता सरकारी मंजुरी अनिवार्य असेल. चांदीच्या आयातीच्या काही श्रेणींना रिझर्व्ह बँकेच्या नियमांखालीही आणण्यात आले आहे. धोरण बदलामुळे चांदीच्या पुरवठा साखळीवरील नियंत्रण अधिक कडक झाले आहे.

# बकुळा



## वऱ्हाडी कथा

चांदन टिपूर आभाळाच्या अंगअंगावर पडलं होतं.

चंद्र अर्ध गोलाकारात होता. आकाश काळेभोर एखाद्या नांगरलेल्या शेताप्रमाणे भासत होतं. बकूळा दामोदरच्या कुशीत घट्ट बिलगून होती. तीच रोमनरोम शहारत होत. काळजात सौख्याचे अमृत पाझरत होतं. गावात निरव शांतता पसरली होती. रातकिड्यांची किरकिर अधूनमधून ऐकू येत होती. बकूळाचे ओठ वावटळीत झाडाचे पान थरथरावे तसे थरथरत होते. अंगावर काटा ऊभा झाला होता. दोघाच्या मिठीत वाऱ्याला पायबंद घातला गैला होता. दोघात सुताचे सुध्दा अंतर नव्हते. ते दोघही प्रणय सुखाच्या डोहात डुंबून तल्लीन होऊन मग्न नी एकरूप झाले होते. भाजी शिजतांना भगून्यावर ज्या प्रमाणे झाकन ठेवावे त्याच प्रमाणे दामोदरने बकूळाच्या ओंठावर अगदी अलगद ओठ ठेवले होते. टाकसळीगत चुंबनांचा वर्षाव होत होता. दोघही पिसाळले होते. बकूळेच्या काळजाची धडधड सुरांसारखी जलद गतीने होत होती आणि दोघही संसार सुख घेण्यात रममाण, एककल्ली झाले होते. तेवढ्यात दाराची साखळी वाजली. दोघही घाबरले नीट सावरत. बकूळा दार ऊघडायला गेली. दार ऊघडल गेलं. दारात ऊभा होता भैरव. भैरव बकुळेला एकटक पाहत होता. तीचे केस विस्कटलेले होते. माथ्यावरलं कुकू मेनाला सोडूनं चवभवतालं मळवट भरल्यासारखं पसरलं होतं. ओठ पांढरेफट्ट पडले होते. लुगळ्याचा पदर छातीवरूनं सरकलेला होता., चोळी तंग होती. भैरव ची नजर कुतऱ्यागत तीच्या अंगावरूनं बोटी बघावी तशी फिरली होती. बकूळा अंगपिंडान ठस्स भरीव होती. तीचा ऊभार लेणीगत रेखीव होता. चेहरा देखना, हसरा आणि कुणालेली भूल पाडेल असा होता. गरीबीमुळे बकूळा दामोदरच्या झोळित पडली होती. भैरव पाटील हा गावातला मोठा जमीनदार. दामोदर हा भैरवकडे सालगडी म्हणून कामाला होता. दामोदर पडेल ते काम करत असे. मग शेतीतली असो वा घरातली. दामोदरच बकूळा सोबत लग्न होऊनं अवघे सहाच महिने झाले होते. लग्न झाल्यावर दामोदर आणि बकूळा दर्शनाला पाटलाच्या वाळ्यात गेले होते. तेव्हापासून बकूळा भैरव पाटलाच्या नजरेत बुबळावानी बसली होती. भैरव विचार करीत असे. ह्या पाखराले कवा मुठीत धरतो म्हणून.

दामोदरन बायकोले आवाज देत म्हतल. बकुळे कोन आलं व दारात. धाकटे मालक हायेत. अरे बापरे! देवाचे पाय माह्या झोपळीले लागले..असा पुटपुटत थो ऊठला. केस सावरत दारात आला.

मालक रामराम. दामोदर दोन्ही हात जोडून नी छातीवर धरूनं अंत्यत अदबीने, नम्रपणे मान खाली घालूनं बोलला. रामराम दामोदर. ईकळे गरीबाच्या झोपळीत कस येनं केलं सरकार. आपण निरोप धाळ्ळा असता त मीच आलो असतो ना. कामून बापा मी तुह्या घरी आलो त चालत नाही काय?

तुमचच घर हाय सरकार. तुमचीच देन हाय हे घर. काय काम होत सरकार. दमोदर खाली मान घालूनं हळूवार बोलला. घरात बलावशीन काय नायी. का अथिसाच दारात सांगू. माफ करा सरकार. या घरात या. अय बकूळे पिळं टाक सरकारले बसाले

पिळ टाकतानी बकूळा वाकली. भैरवची चोरटी नजर बकूळेच्या छातीवरूनं भुर्रकन फिरली. बकूळा कावरी बावरी झाली. तीनं पदर छातीवर ओढून धरला. बकूळा तशी हुशार होती. माणसाची चांगली आणि वाईट नजर ओळखत होती.

दामोदर जवार घेऊन तालुक्यात जा लागते तुले ऊद्या. जातोना सरकार. भैरव बकूळे कडे शिकारीगत बघायला लागला. दामोदर जरा खाकरूनं बोल्ला.

बकूळे सरकारले चा ठुय. दुद जरा जास्त टाकजो अन् साखऱ्या जरा कमी. सरकारले फिक्का चा आवळते.

बकूळाने चूल पेटवली. गंजूली ठेवली. पानी, चा पत्ती, गवती चा, साखऱ्या, दोळा, अदरक टाकलं. चा ले गदका आला तस दुध टाकलं. चा टुटलेल्या कानाच्या सिंगलावर चायनी धरून भरला गेला. बकूळेनं दोन कप शिगोर भरून आनले. बोट जयत होते. एक कप भैरव पुढे नेला. त्यानं पापन्या ऊचलूनं बकूळेकडे पाहिलं नंतर वाफाळत्या शिंगलाकडे पाहिलं आणि बकूळेचे बोट दामोदरच्या न कळत दाबले तशी बकूळा घाबरली आणि तीने शिंगल सोडला. चहा चे शिंतोडे बकूळेच्या लुगड्यावर आणि भैरवच्या धोतरावर ऊडले. तसा दामोदर किंचाळला. काय बकूळे कशी ग तू चा मातीत घातला. हा माझा शिंगल दे सरकारला.

मी भाकर पलटून येते. करपून जाईन भाकर. अस खोटनाट बोलूनं बकूळा रांधन घरात पळाली. दामोदरनं चहा अर्धा अर्धा केला.दोघे पिले आणि भैरव दाराच्या चौकटीतूनं वळूनं पाहत बोलला. लवकर ये ऊद्या मंग दामोदर तुले जा लागनं तालुक्याले. दामोदरनं होकार भरला. रांधन घरात गेला. बकूळेनं भाकरी थापल्या, तुरीच्या चिपळाच्या गोयाची भाजी केली दोघही पोटभर जेवले आणि झोपी गेले.

बकूळा पायटच्या पाचच्या अजानला ऊठली. तीने सडा सारवन, आंघोळ केली, तुळशीला पाणी वाहलं, दिवाबत्ती केली, देव न्हानले, चहा बनवून नवऱ्याला दिला. भाकरी थापल्या. न्याहारी दिली.

संध्याकाय होईल म्हणून शिदोरी बांधूनं दिली. दामोदरनं जायची तयारी केली. जाताना बकूळेच्या गालाचे चुंबन घेतले. बकूळा दामोदरची पाठमोरी मूर्ती बघत अंगणात ऊभी होती. दामोदरने मागे वळून पाहिले तर बकूळा त्यालाच न्याहाळत होती. भैरवची बायको सग्यासचयऱ्याच्या लगनाले गेली होती. भैरवनं साऱ्या सालगड्यांना रजा दिली होती. फक्त एकच विश्वासातला माणूस बापूराव हा भैरव पाटलाच्या दिमकतीला वाड्यावर होता. भैरव बापूरावला बोलला.

बापू एक काम कर गळ्या माह्यं. सरकारचा हुकूम सर ऑखोपर. बोला सरकार काय करू. दामोदरच्या घरी जाय अन् त्याच्या बायकोले बलावूनं आनं. काय निरोप देवू सरकार. कायच्यासाठी बलावलं म्हनून. अरे भैताळ्या. त्वाली लक्ष्मीबाई वैनीसाहेब लगनाले गेल्या ना मंग मले भाकर टुकळा कोन करनं.

माह्या घरूनं आनतो ना सरकार. गावरानं कोंबळ अन् जवारीच्या पाच सहा भाकरी . थो दामोदर मटन खात नाही ना त्याची बायको खात. मंग तीले कस बनवता येईनं मटन. थ्या परीस माह्या बायकोले आनतो सरकार.

अरे! भैताळ बेलन्या तुले जे सांगल थे करनं. काहाले फुकटचे ऊंखंडे फुकत. भैरव रागारागात बोलला. बर सरकार तुम्ही म्हसान तस करतो. बापूरावनं खजील होवूनं मान डोलावली. अन काठी घेऊन तडक तो दामोदरच्या घरी आला. काठीनं दार वाजवलं. बकूळाला वाटले तीचा नवराच आला. ती हरकलि अन आनंदाने धावत येऊन तीने दार खोलले. तीचा चेहरा बापूराव दारात ऊभा पाहताच बकूळाचा चेहरा पडला. बकूळा नाराज होवूनं बापूरावला म्हणाली.

भावजी या ना घरात. बकूळेनं जल्मरीच्या ग्लासात पाणी दिल. चुलीवर चा ठुयला. बापूराव चा पिला. बकूळा बापूरावच्या पुढे पाय दुमडून बसली. भावजी अजूनं हे आले नाही. कवा येतीनं. पायटी येयन दामोदर. तालुक्याले गेल्यावर टायम लागनारचं. अव मायबाई हे त म्हनत होते. सयसंध्याकाय लोग येयन म्हनूनसन्या. बरं थे जावूद्या कस काय येनं केलं ईकळे. वयनी तुम्हाले भैरव पाटील सरकारनं वाड्यावर बलावलं.

बकूळा भैरवच नाव ऐकताच भांबावली, घाबरली, टरकली...आणी तीची छाती ढोल बदळावा तशी बदडल्या जात होती. डोळ्यात भिती दाटून आली होते. जिभीला लकवा पडल्यागत बोलली.

..का...हा...ले..ब..लावल..

सैपाकाले. कामून तेयची बायको कुठ गेली पासली पळाले. थ्या वैनीसाहेब गेल्या सोयऱ्याच्या लगनाले. बाबूळगावले..चला पटकन तेयले भूक लागली असनं.

बकूळाचे अंग नी अंग थरथर हरिणवानी कापत होत. आता काय कराव. गेली त अब्रू जाते अन नाही गेली त नवऱ्याच काम. तिने काही वेळ विचार करत ऊठली. चांगभांग केला. घोयात ईवा टाकला. अन निंघाली बापूरावच्या मागे मागे.भैरव त्याच्या वाड्याच्या खिडकीतून बकूळेची चातका सारखी वाट बघत होता. त्याला दुरूनचं बकूळा दिसली आणी तो अंगोपांगी शहारला, मोहरला, प्रफुल्लित झाला. त्याच्या चेहऱ्यावर चांदील दाटली. बापूरावने बकूळेला रांधन घर दाखवल, पिठ, मीठ, तिखटाचे गाडगे दाखवले. बकूळेने विजेच्या गतीने सैपाक केला. हात धुतला आणि बापूरावला जाता जाता म्हणाली...

भावजी जातो म्या घरी. दवळीत भाकरी बनवून ठेवल्या अन दवळी शिक्यावर ठुयली हायं. आलूवांग्याची भाजी गंजात शिजवून ठुयली. जातो मंग मी आता. अस बोलत बकुळा आनंदीत होवून वाड्याबाहेर पावल टाकत चालली होती. हरनाने वाघाच्या तावडीतूनं सुटाव तस तीला वाटत होते. तीचे पावल मोठमोठे नी भरभर पडत होती. तीला आनंद अपार झाला होता. तेवढ्यात भैरवचा आवाज दुमदुमला...बकुळे थांब.

बकूळाच्या आनंदावर विरजन पडलं. तिचे पाय थबकले, पोटऱ्यात कंप भरला, काळजात जी मघाशी तसार वाजत होती तीच रूप ढोलानं घेतलं होतं. तीने डोक्यावर पदर घेत म्हतलं.

काय सरकार? खिचळी बनव अन हे कोंबड आनल थ्याले छिलूनं साजरी भाजी बनव मले आवळते. बापू तेवढ्यात खेकरत बोल्ला सरकार तीले कोंबड कापता येत नाही ना शिजवता येत. माह्या घरूनं आनू काय बनवूनं.

नाही बापू मले अथिसाच बनवून पाह्यजे. असा दरडावत फनकाऱ्यानं भैरव बोलला. वैनी कायजी करू नोका मी बात देतो कोंबड कापून. तुम्ही तुरीची दाय टाका चुल्यावर शिजाले. बकूळेनं चुलीवर पानी ठेवलं. तुरीची दाळ निसली. आंदन आल्यावर दाळ टाकली. गदका आल्यावर तांदूळ निसूनं टाकले. खिचडी चुलीवरची ऊल्ह्यावर आली. बापूनं कोंबड्याचं मानगुट धरलं चर्रकन सुरीनं मुंडक धळा वेगळं केलं. कोंबड फडफडत थंड झाल. अंगावरचे पंख ओरबाडून काढण्यात आले. खरपावर सुरा पाजवण्यात आला. लाकडाच्या गोल बुंद्यावर कोंबड्याचे तुकडे करण्यात आले. गरम पान्याने धुवूनं हयद मिठाच्या पान्यात भगून्यात सोडण्यात आले. कोंबड शिजलं. तिखट, मिठ, आरात भाजलेला कांदा नी खोबर मसाल्याची फोडणी देण्यात आली. भाजी तयार झाली. बकूळा आता पुन्हा हरकली. बापूराव बकूळाला बोलला. वैनी जा आता घरी. लय रात झाली. मी येवू काय सोळाले घरी. नाही नाही भावजी मी जातो एकली. आपलच गाव हाय. काहाच भेव हाय.जातो एकलीचं.

कुतरे गीतरे पायजा देसान अंधारात पाय. बराबर जा. बापूराव लय साजरा माणूस आहे. आपल्याला खुप मदत केली. धनी दामोदररावचा खरा मैतर हाय. अडीअडचणीले, सुख-दुखात धावूनं येतो. अस मनात म्हनत चाल्ली. तेव्हाच वाघाने डरकाडी फोडाव तसा भैरव पुन्हा ओरडला.

बकुळे!... सैपाक केला खरी...पन वाहळून कोन देईनं. बकूळा आता घायबरली. भैरवच्या मनात कायबेर हाय. हे तिनं हेरलं. हा डाव साधन्याचा प्रयत्न करेल. पन ह्या आडदंड मानसापुळे माह्यासारख्या पिटूकल्या बाईचा टिकाव लागन काय? ह्या ईचारात ती गुंग झाली होती. बकूळा डबलूनं रांधन घरात आली. तीला तो वाडा नकोसा झाला होता. चौभवताल तीने नजर फिरवली. वाडा चिरेबंदी, मजबूत दार. वाड्याची फिताळ आ वासून ऊभी दिसत होती. तीने तासकी घेतली वाढायला सुरवात केली. तितक्यात भैरव दरडावला.

बापू मले मोहाची दारू तांब्याभर घेवून ये बर पंचायाकळूनं. बापून लोटा घेतला अन् निंघाला. आता बकूळेचा थ्या चिरेबंदी वाळ्यातला एकमेव सहारा थो ही निघून गेला होता. बकुळा थरथरत होती. वाळ्यात तीचा जीव घुटमळत होता. भैरव बकूळाजवळ आला.

बकूळे माह्य एक काम करशीन काय? कोन्च सरकार. बकूळाचे ओठ थरथरत होते. अंगाला थंडीसारख कापर भरलं होतं. आजच्या राती माह्यी होशीन काय? तुले लागन थे देतो...फकस्त....बकुळानं डाव ओयखला. मटनाची तासकी भैरवच्या तोंडावर क्षणात भिरकावली. भैरव मटनान माखला. तो आता पिसायल्या कुत्र्यावानी झाला होता. त्यान अंदरून दाराचा कोंडा लावला, कुलूप बंद करून जोरजोरात राकेसा सारखा हसायला लागला. बकुळा मलूल झाली. ती भैरव ला दयायाचना करत होती.

सरकार अस नोका करू. तुम्ही अस करसान त मी तोंड दाखवाच्या लायकीची ना राह्यनं. मले एकत मरा लागन नाही त मारा लागनं.

अस म्हनत तीने घोयात असलेला ईया काढूनं वार केला. पण त्याने वार हुकवत तीचा हात धरलं जवळ ओढल. तीच्या गळ्यावरूनं हात फिरवाले लागला. ती भैरवला ईज्जतीची भीक मागत होती. पण तो ऐकत नव्हता. तो आता मनसुबा पुरा करनार तितक्यात बापू आला. बकूळाचा आवाज दाराच्या आडून ऐकत होता. त्याने क्षणाचाही विलंब न करता एका लाथेत दार पाडलं आणि कंबरेची पाजवलेली कुऱ्हाड भैरवच्या मस्तकात हानली. एका फटक्यात भैरवची कवटी फुटली. रक्तबंबाळ होऊन भैरव निपचित पडला. बकूळा घाबरली. आता काही खर नाही भावजी आपलं. आपल्याले फाशी जा लागनं.

भेदरलेल्या स्वरात बकूळा बोलली.

वयनी कायजी करू नोका. मी सार ठिक करतो. तुम्ही घाबरू नोका. हे गोठ कानोकान कोनाले मालूम नाही झाली पाह्यजे दामोदरले ही नाही.

बकूळेनं मान हालवली अन थे भयभीत होत घरच्या दिशेनं निघाली. बापू ताळकन ऊठला. संग दोन पोते घेवूनं जंगलात गेला. दोन कोल्हे त्याने पोत्यात पकडून वाड्यात आणले. ज्या खोलीत भैरवले मारलं थ्या खोलीत दोन्ही कोल्हे सोडले. दार बाहेरून लावलं. पोते जाळून टाकले, कुऱ्हाड विहरीत टाकली.अन् रातभर दाराच्या बाहेर पहारा करून थो ऊभा होता. दाराच्या फटीतून त्याने आत पाहले तर दोन्ही कोल्हे भैरवचा लचका तोडत होते. पहाट होताच बापूने खोटीनाटी बोंब ठोकली. धाकट्या सरकारले कोल्ह्यान मारलं, फाडलं, खाल्ल. अवघ गाव जमा झालं. सार गाव पाहत होत की, कोल्हे भैरवला खात आहेत. बकूळा मात्र अंगावर वाकळ घेऊनं भयभीत होऊन रडत होती. दिस,मास, साल लोटल अन् सार काही आलबेल झालं. असा हा बापूराव दामोदरचा खरा मित्र होता.

**– सु. पुं. अढाऊकर**
अकोला.
मो. ९७६९२०२५९७

# घर असावे घरासारखे : डिजिटल भिंती आणि हरवत चाललेलं घरपण

आजच्या आधुनिक युगात आपण सिमेंट-काँक्रीटचे आलिशान बंगले उभे केले आहेत, घराचं इंटिरिअर करण्यासाठी लाखो रुपये खर्च केले आहेत, पण तरीही त्या चार भिंतींमधली शांतता अनेकदा अस्वस्थ करणारी असते. म्हणतात ना, घर असावे घरासारखे, नको नुसत्या भिंती...मग हे घरपण नक्की कशात असतं? ते असतं एकमेकांवरच्या विश्वासात, पारदर्शक संवादात आणि संघर्षातही जपलेल्या आदरात.

**शब्दांच्या जाळ्यात हरवलेल्या भावना**
(Social Media vs Reality)

आज आपण सोशल मीडियाच्या जगात तासन्तास चॅटिंग करतो. इमोजी आणि शब्दांच्या माध्यमातून संवाद साधण्याचा प्रयत्न करतो. पण विचार करा, त्या चॅटिंगमध्ये समोरच्या व्यक्तीला खरोखरच जिव्हाळा जाणवतो का? तर मुळीच नाही. स्क्रीनवर दिसणारे शब्द हे केवळ निर्जीव अक्षरं असतात; त्यातील ओलावा, आवाजातील कंप आणि डोळ्यांतील भाव चॅटिंगमधून कधीच समजू शकत नाहीत. आपण हजारो मेसेज करतो, पण प्रत्यक्ष भेटीत मिळणारी साधी शाबासकीची थाप किंवा मायेची मिठी जे सांगून जाते, ते डिजिटल तंत्रज्ञान कधीच करू शकणार नाही.

**डिजिटल जवळीक की भावनिक दुरावा?**

नोकरी-व्यवसायानिमित्त कुटुंबातील सदस्य वेगवेगळ्या शहरांत स्थायिक होतात. आपण फोन आणि व्हीडीओ कॉलच्या संपर्कात असतो. तंत्रज्ञानाने आपल्याला स्क्रीनवर जवळ आणलं खरं, पण यामुळे खरोखरच जिव्हाळा वाढतो का? सहवास जितका जवळचा, तितकेच एकमेकांचे मन समजून घेणे सोपे जाते. लांबून केलेल्या व्हीडीओ कॉलपेक्षा प्रत्यक्ष घरात एकत्र राहून होणारा संवाद नात्यातला मान-सन्मान आणि जवळीक अधिक घट्ट करतो.

**संवादातील पारदर्शकता आणि हेल्दी जवळीक**

आज एकाच छताखाली राहणारी माणसं विषय नाही असे म्हणून एकमेकांशी बोलायचे टाळतात. आई-वडील वृद्ध झाले म्हणून त्यांच्याशी बसून दोन शब्द प्रेमाचे बोलण्याकडे तरुण पिढी दुर्लक्ष करते. जोपर्यंत आपण घरातील सदस्यांशी पारदर्शकता ठेवत नाही किंवा त्यांना विश्वासात घेऊन जवळीक साधत नाही, तोपर्यंत घराला घरपण येत नाही. आज आपण स्वतःच्याच माणसांना मनातलं सुख-दुःख सांगायला लाजू लागलो आहोत. ही संकोचाची भिंतच एकमेकांच्या मनातील भाव ओळखण्यात मोठा अडथळा ठरत आहे.

**वादविवाद: नात्यातली प्रेमाची फोडणी**

जसं म्हणतात की, जिथे भांड्याला भांडं लागतं, तिथेच जिव्हाळा असतो.घरात कधीतरी वाद-विवाद होणे हे नात्याच्या जिवंतपणाचे



लक्षण आहे. त्यातूनच एकमेकांचे विचार स्पष्ट होतात. मात्र, इथे एक खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. घरातील वाद हे घराच्या उंबरठ्यातच आणि ठराविक वेळेपुरतेच मर्यादित असावेत. ते मनात साठवून ठेवून नात्यात कायमचा कडवटपणा येऊ देऊ नये.

**घराची अब्रू आणि समाजाचा दृष्टिकोन**

सर्वात महत्त्वाचा आणि कडू नियम म्हणजेघरातील वाद कधीही घराबाहेर नेऊ नका. आपल्या माणसांबद्दल बाहेरच्या व्यक्तीकडे कधीही अपशब्द बोलू नका. हे नेहमी लक्षात ठेवा की, हा समाज फक्त दुसऱ्यांच्या चुका आणि दोष शोधण्यासाठी उत्सुक असतो. आपल्या घरातील वादाचे भांडवल करून लोक फक्त मजा बघतात, प्रत्यक्ष मदत कोणीच करत नाही. घराची प्रतिष्ठा ही उंबरठ्याच्या आतच सुरक्षित असते, हे भान प्रत्येकाने राखायला हवे.

**निष्कर्ष:** घरपण हे कोणत्याही वास्तूशास्त्राने येत नाही, ते निर्माण करावं लागतं आपल्या वागण्यातून आणि सामंजस्यातून. जिथे मनं मोकळी होतात, जिथे शब्दांपेक्षा भावनांना महत्त्व दिलं जातं, जिथे चुकांना माफी मिळते आणि जिथे एकमेकांचे दोष जगासमोर न मांडता घरातच दुरुस्त केले जातात, तेच खरं घर! आपल्या घराच्या भिंतींना फक्त रंगाने नाही, तर विश्वास, पारदर्शकता आणि जिवंत संवादाने सजवा; मग पहा तुमचं घर कसं खऱ्या अर्थाने घर वाटू लागेल!

**–रोहित विलासराव भोसीकर**
संचालक :
भोसीकर फुड्स, नांदेड, महाराष्ट्र.
मो. ८८०५५७५५५५

# जाब

गंधवेडी अबोली*
नावातच दरवळ, रंग केशरी
मनाच्या अंगणी मी अबोली खरी
शब्दांचा गंध, अक्षरांची प्रीत
कागदावर फुलते माझी कविता, गीत
ना प्रसिद्धीसाठी, ना मानासाठी
लिहीत राहिले फक्त स्वता:साठी
थोडे आयुष्य, पण गंध अपार
मनामनांत राहो शब्दांचा सार
आयुष्याचे उलटेल पान
अबोली मनातली, तशीच छान
नवी कांदबरी, नवा शब्दसाज
उमटतील शब्द, करतील आगाज

**–रूपाली वागरे–वैद्य**
नांदेड
९८६०२७६२४१

# करू नको अहंकार...

जगी नाम होण्यासाठी
आधी तपावे लागते ।
अरे चंदनासमान
नित्य झिजावे लागते ।।
आयत्याला कुठे इथे
गोड लागते भाकरी ।
त्यांना भोगावे लागते
फक्त दुःख नानापरी ।।
हिनवून दुबळ्यांना
तुझी लायकी दावतो ।
अरे कशाला माणसा
पशु समान जगतो? ।।
तुज मरण येईल
तेंव्हा मातीच होशील ।
देह मातीचा पुतळा
किती काळ टिकशील? ।।
प्रेमरूपी मद्यप्याला
जरा तुझ्या ओठी लाव ।
मदतीला गरिबांच्या
मनोभावे नित्य धाव ।।
जग सद्भावे माणसा
करू नको अहंकार ।
जन्म देणाऱ्यांचे कधी
भुलू नको उपकार ।।

**–अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी ता.दारव्हा, जि.यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

# गझल सम्राट ; पंकज उधास

आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांची आज जयंती आहे. पंकज उधास यांचा जन्म १७ मे १९५१ रोजी गुजरातमधील जेतपूर येथे जमीनदार कुटुंबात झाला. पंकज उधास यांचा संपूर्ण परिवार संगीत क्षेत्राशी निगडीत आहे. त्यांचे आजोबा गावातील पहिले पदवीधर होते. त्यांनी भावनगरचे दिवाण म्हणूनही काम केले. त्यांचे वडील केशुभाई आणि आई जितुबेन यांनी पंकज उधास यांच्या संगीत प्रतिभेस प्रोत्साहन दिले. केशुभाई सरकारी नोकर असले तरी त्यांनीही आपली संगीत कला जोपासली होती. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे हिंदी चित्रपट सृष्टीत पार्श्वगायक आहेत तर दुसरे बंधू निर्मल हे देखील गझल गायक आहेत.

पंकज उधास यांच्या आई - वडिलांनी पंकज यांना सुरुवातीस तबला शिकवला त्यानंतर शास्त्रीय संगीत शिकण्यासाठी गुलाम कादर खान साहेबांकडे पाठवले. मुंबईत आल्यावर त्यांनी ग्वाल्हेर घराण्यातील गायक नवरंग नागपूरकर यांच्या



मार्गदर्शनाखाली शास्त्रीय संगीताचे धडे गिरवले. १९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे. नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुम पे प्यार आया है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने.

चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची आओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शोही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता.

१९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले. या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली.

त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली. गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. २६ फेब्रुवारी २०२४ रोजी वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली. गझल सम्राट पंकज उधास यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# अवैध व्यवसाय विरोधी मोहिमेत आणखी ४४ गुन्हे दाखल, ६१ इसमांविरुद्ध कारवाई

## पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाकडून कुंटूर येथे गुटखा जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** दिनांक १ ते ३१ मे २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या १५ व्या दिवशी पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या अधिपत्याखालील पथकाने नांदेड जिल्ह्यातील कुंटूर पोलीस ठाणे हद्दीत साठवणूक केलेला २ लाख ४७ हजार ९ रुपये किंमतीचा गुटखा जप्त केला आहे. यातील आरोपींविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यास दहा वर्षांच्या कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

त्याचबरोबर, मटका-जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण १० इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ६ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ४५ हजार २७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासोबतच अवैध दारू विक्री करणाऱ्या २७ इसमांविरुद्ध २४ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून ९० हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्धही २ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून ४६ लाख ११ हजार ८०२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त कारवाई सोबतच शस्त्र अधिनियमान्वये ३, कोटपा अन्वये २, तर इतर अधिनियमाखाली मिळून एकूण ४४ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण ६५ लाख ७१ हजार ४२६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**'खबर' हेल्पलाईनला नागरिकांचा प्रतिसाद**

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी या दृष्टिकोनातून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली आहे. या हेल्पलाईनला नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हॉट्सअप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# देगलूर-कर्नाटक सीमा जोडणारा महत्त्वाचा मार्ग होणार विकसित

## खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रयत्नांना यश



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र आणि कर्नाटकाला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा रस्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देगलूर ते कर्नाटक सीमा जोडणाऱ्या महत्त्वाच्या मार्गाच्या विकासाचा प्रश्न आता मार्गी लागला आहे. जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील महत्त्वाच्या रस्ते विकास कामांना एशियन डेव्हलपमेंट बँक सहाय्यित योजनेअंतर्गत सर्वेक्षण आणि डी.पी.आर. तयार करण्याच्या निविदा कामास मंजुरी मिळाली आहे. खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी सतत पाठपुरावा केला होता. या कामांच्या सर्वेक्षण आणि डी.पी.आर.च्या निविदांना मंजुरी देण्यात आली असून, सीमावर्ती भागातील वाहतूक व्यवस्थेला यामुळे मोठी चालना मिळणार आहे.

देगलूर तालुका हा महाराष्ट्र-तेलंगणा-कर्नाटक सीमावर्ती भागांना जोडलेला महत्त्वाचा दुवा असून येथे नैसर्गिक संसाधनामुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली होती. विशेषतः पावसाळ्यात वाहतुकीस अडथळे निर्माण होत असल्याने नागरिक, शेतकरी, विद्यार्थी तसेच व्यापाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर खा. डॉ. अजित गोपछडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याकडे विशेष पाठपुरावा करून सदरील रस्ते एशियन डेव्हलपमेंट बँक सहाय्यित प्रकल्पांतर्गत समाविष्ट करण्याची मागणी केली होती. या महत्वाच्या रस्त्यास मंजुरी दिल्याबद्दल खा. गोपछडे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे विशेष आभार मानले आहेत.

या अनुषंगाने देगलूर, करडखेड, मरखेल, हणेगाव ते कर्नाटक राज्यसीमा या प्रमुख मार्गावरील रस्ते सुधारणा व पूल बांधकाम सर्वेक्षण आणि डी.पी.आर. तयार करण्याच्या निविदा कामास मंजुरी प्राप्त झाली आहे. लवकरच कामास सुरुवात होणार आहे. देगलूर तालुक्यातील या मंजूर कामांमुळे सीमावर्ती भागातील दळणवळण अधिक गतिमान होणार असून, शेतमाल वाहतूक, व्यापार, शिक्षण व आरोग्य सेवांना मोठा फायदा होणार आहे. विशेष म्हणजे नांदेड-बिदर मार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित, वेगवान आणि सुलभ होणार असून सचखंड श्री हुजूर साहिब, नांदेड तसेच कर्नाटकातील ऐतिहासिक गुरुद्वारा श्री नानक झिरा साहिब येथे दर्शनासाठी देश-विदेशातून येणाऱ्या लाखो शीख भाविक व पर्यटकांना या रस्त्याचा मोठा लाभ होणार आहे. धार्मिक पर्यटनाला चालना मिळून सीमावर्ती भागातील आर्थिक आणि सामाजिक विकासालाही नवी गती मिळणार असल्याचे मत खा. डॉ. गोपछडे यांनी व्यक्त केले आहे.

# डेंग्यू ताप आजार टाळण्यासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी

## जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अमृत चव्हाण यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** डेंग्यू ताप आजार टाळण्यासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अमृत चव्हाण यांनी केले आहे.

डेंग्यू ताप विशिष्ट विषाणूमुळे होतो. डेंग्यूचा प्रसार हा एडिस इजिप्टाय नावाच्या डासाच्या मादीमार्फत होतो. या डासाची उत्पत्ती साठवून राहिलेल्या पाण्यात होते. कोणतेही पाणी आठ दिवसांपेक्षा जास्त साठवून ठेवल्यास त्यामध्ये डास अंडी घालतात. त्यानंतर अंड्याचे रूपांतर डासात होते. कोणतेही साठविलेले पाणी हे आठ दिवसांपेक्षा जास्त ठेवू नाही. याबाबत नागरिकांनी खबरदारी घेणे आवश्यक असून, डासांची उत्पत्ती कमी करुन नियंत्रणात ठेवण्यासाठी नागरिकांनी आरोग्य यंत्रणेला सहकार्याची आवश्यकता आहे.

नांदेड जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थेत राष्ट्रीय डेंग्यू दिन शनिवार, दि. १६ मे २०२६ रोजी साजरा करण्यात आला. २०२६ या वर्षीचे घोषवाक्य डेंग्यू नियंत्रणासाठी लोकसहभाग : साठलेल्या पाणीसाठ्यांची तपासणी करा, स्वच्छता राखा आणि ती भांडी झाकून ठेवा असे आहे. नागरिकांमध्ये जागरुकता आणून डासांपासून होणाऱ्या डेंग्यू आजारास प्रतिबंध करण्यासाठी राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा करण्यात येतो. डेंग्यूचा प्रसार हा एडिस इजिप्टाय नावाच्या डासाच्या मादीमार्फत होतो. या डासाची उत्पत्ती स्वच्छ साठवून राहिलेल्या पाण्यात होते. उदा. सिंमेट टाक्या, रांजण, प्लास्टिक रिकाम्या बादल्या, नारळाच्या करवंट्या, घरातील शोभेच्या कुंड्या, निरउपयोगी वस्तू, टायर्स व कुलर ईत्यादी. जास्त दिवस साठलेल्या ठिकाणी एडिस इजिप्टाय डासांची मादी अंडी घालते. एक डास एकावेळी दीडशे ते दोनशे अंडी घालते व यातून या डासाचा मोठा फैलाव होतो.

डेंग्यू ताप आजारात रुग्णास दोन ते सात दिवस तीव्र स्वरुपाचा ताप येतो. डोके, सांधे, स्नायू दु:खीचा त्रास होतो. रुग्णास उलट्या होतात. डोळ्याच्या आतील बाजू दुखणे, अंगावर पुरळ येणे, नाक-तोंड यातून रक्त स्त्राव होतो. अशक्तपणा, भूक मंदावते, तोंडाला कोरड पडते ही लक्षणे दिसून आलेल्या रुग्णांनी वेळेत जवळच्या शासकीय रुग्णालयात जाऊन मोफत तपासणी व उपचार करुन घेणे आवश्यक आहे.

नांदेड जिल्ह्यात मागील तीन वर्षांची डेंग्यूची परिस्थिती पुढीलप्रमाणे आढळते. ( घेतलेले तपासलेले रक्तजल नमुने) कंसाबाहेर डेंग्यू दूषित रुग्ण, नंतरच्या (कंसात मृत्यू रुग्ण). सन २०२३- (१४९०) २९२ (निरंक). सन २०२४ (१३०२) २९७ (निरंक). सन २०२५ -(१०३९) १६१ (निरंक) तर एप्रिल २०२६ अखेर- (२०८) ०९ (निरंक).

भविष्यात डेंगीताप या आजाराचा उद्रेक होवू नाही. यासाठी काय काळजी घ्यावी याबाबत पुढील साधे व सोपे प्रतिबंधात्मक उपायांची नागरिकांनी अंमलबजावणी करावी. आपल्या घराभोवताली पाणी साचू देवू नका. घरातील पाण्याचे सर्व साठे आठवड्यातून एकदा रिकामे करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आपले सरकार सेवा केंद्रासाठी नांदेडमध्ये पार पडल्या मुलाखती



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील १३६२ आपले सरकार सेवा केंद्रासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात १५ मे रोजी प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. जिल्हा सेतू समितीच्या वतीने या केंद्रासाठी शुक्रवारी अर्धापूर, उमरी, कंधार, किनवट, देगलूर, धर्माबाद, नांदेड आणि माहूर या आठ तालुक्यांतील ५६९ उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या.

जिल्ह्यात ग्रामीण भागात आपले सरकार सेवा केंद्रासाठी जिल्हा सेतू समितीच्या वतीने अर्ज मागविण्यात आले होते. या १३६३ केंद्रांसाठी प्राप्त झालेल्या अर्जांच्या छाननीनंतर मुलाखतीची प्रक्रिया १५ मे रोजी सुरू झाली आहे. मुलाखत प्रक्रियेसाठी उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्यासमवेत एकूण १२ स्वतंत्र मुलाखत कक्षांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचवेळी आठ तालुक्यासाठी स्वतंत्रपणे आठ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून उमेदवारांच्या मार्गदर्शनासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्यात आली होती.

या मुलाखतीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात ऊन व पावसापासून संरक्षण होईल अशा प्रकारच्या मोठ्या मंडपाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. ही मुलाखत प्रक्रिया पारदर्शक आणि गोपनीय पद्धतीने व्हावी यासाठी रँडम पद्धतीचा अवलंब करण्यात आला. तालुक्यांचे बारा गट करून ते संबंधित मुलाखत कक्षांना वेळेवर वितरित करण्यात आले. त्यामुळे कोणत्या उमेदवाराची मुलाखत कोणत्या अधिकाऱ्याकडून घेतली जाणार आहे याची माहिती कुणालाच उपलब्ध नव्हती. ती माहिती मुलाखतीच्या दिवशीच अधिकाऱ्यांसह उमेदवारांनाही कळाली. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व निष्पक्षपणे पार पडली.

मुलाखतीसाठी तालुके वाटप झाल्यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांनी सर्व उमेदवारांना त्यांच्या मुलाखत कक्षाबाबत आणि नेमून दिलेल्या कर्मचाऱ्यांबाबत माहिती देऊन प्रभावी समन्वय साधला. जिल्हा प्रशासनाने कोणत्याही प्रकारच्या मध्यस्थी किंवा गैरप्रकारांना वाव न देता अतिशय पारदर्शक व गोपनीय पद्धतीची अंमलबजावणी केली. संपूर्ण दिवसातील मुलाखती अत्यंत सुरळीत, शिस्तबद्ध आणि कोणत्याही अडचणी शिवाय पार पडल्या.

या यशस्वी आणि पारदर्शक मुलाखती पार पडण्यामागे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे प्रभावी मार्गदर्शन सुयोग्य नियोजन आणि प्रशासकीय दृष्टिकोनास असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी दिली. अर्धापूर, उमरी, कंधार, किनवट, देगलूर, धर्माबाद, नांदेड आणि माहूर या आठ तालुक्यातील ५६९ उमेदवारांच्या मुलाखती शुक्रवारी १५ मे रोजी पार पडल्या. उर्वरित आठ तालुक्यांतिळ ६५१ उमेदवारांच्या मुलाखती उद्या १६ मे रोजी घेण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी दिली.

# मुदखेड न.प.च्या दोन नामनिर्देशीत सदस्यांची सोमवारी नियुक्ती होणार

**मुदखेड (प्रतिनिधी)–** मुदखेड न. प. च्या दोन स्वीकृत सदस्यांची उद्या सोमवार दि. १८ मे रोजी नियुक्ती करण्यात येणार आहे. याकरिता भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते प्रवीण काचावार यांच्यासह पत्रकार ईश्वर पिन्नलवार, ऋषीकेश पारवेकर, आदी नावे चर्चेत आहेत.

न. प. निवडणुकीत अनेकांनी बंडखोरी केली होती. या बंडखोर कार्यकर्त्यांना शांत करण्यासाठी नामनिर्देशित सदस्य करण्याचे आश्वासन पक्षश्रेष्ठीने दिले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे सुधारीत तरतुदीनुसार व नगर विकास विभाग यांचे शासन परिपत्रकनुसार स्वीकृत सदस्यांची नियुक्ती होणार आहे.

# वाळकी शिवारात तुटलेल्या विद्युत ताराचा स्पर्श झाल्याने शॉक लागून दुभती म्हैस जागीच ठार

**नांदेड (प्रतिनिधी)–**, लोहा तालुक्यातील वाळकी (खुर्द) शिवारात वादळीवाऱ्याने विद्युत पोलवरील तार तुटून जमिनीवर पडला. दरम्यान एका दूध उत्पादक शेतकऱ्याची म्हशीला या तारेचा स्पर्श झाल्याने या घटनेत दुभती म्हैस जागीच ठार झाल्याची घटना शनिवार, दि. १६ मे रोजी घडली. या प्रकरणी उस्माननगर पोलीस स्टेशनमध्ये घटनेची नोंद करण्यात आली. महावितरणच्या हलगर्जीपणामुळे संबंधित शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे.

वाळकी (खुर्द) येथील दूध उत्पादक शेतकरी व्यंकटी सखाराम कदम यांचा दुधाचा व्यवसाय आहे. त्यांच्याकडे दुभत्या म्हैसी आहेत. नेहमीप्रमाणे त्यांचा मुलगा केशव कदम हा पशुपालक दुपारच्या उन्हाची तीव्रता कमी झाल्यानंतर दि. १६मे रोजी दुपारी ४ वाजता म्हशीला सोडून शेताकडे गेला. या वेळी विद्युत पुरवठा करणाऱ्या विद्युत पोलवरील तार वादळीवाऱ्याने तडाख्याने तुटून जमिनीवर पडला होता. त्यात विद्युत प्रवाह सुरू होता. यावेळी एका म्हशीचा या ताराला स्पर्श झाल्याने विजेचा धक्का लागून एक लाख रुपये किंमतीची दुभती म्हैस जागीच ठार झाली. या घटनेची माहिती उस्माननगर पोलीस व पशुवैद्यकीय अधिकारी यांना देण्यात आली. याप्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे.

# वीज ग्राहकांच्या तक्रारीसाठी नांदेडला ग्राहक तक्रार निवारण मंच सुरु

**नांदेड (प्रतिनिधी)–** महावितरणच्या नांदेड मंडलात ग्राहक तक्रार निवारण मंच (सीजीआरएफ) सुरू करण्यात आला आहे. या मंचाच्या माध्यमातून वीज ग्राहकांना त्यांच्या नवीन जोडण्या, वीज देयके, मीटर व वीज पुरवठ्यासंबंधीच्या तक्रारी सादर करता येणार आहेत. तक्रारदार ग्राहकांनी त्यांच्या तक्रारी नांदेड ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे महावितरणच्या संकेत स्थळावर (https://mcp.mahadiscom.in/cgrf) नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

नांदेड आणि परभणी मंडलासाठी जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक कोल्हे यांची अध्यक्ष म्हणून तर सदस्य म्हणून माधव डोम्पले यांची नियुक्ती करण्यात आल्याचे सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता धनाजी रामुगडे यांनी कळविले आहे.

# एमजीएममध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)** –विश्वातील सर्वोत्तम राजकुमार अशी ओळख असलेले शूरवीर, स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात डायरेक्टर डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात साजरी करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

यावेळी उपस्थित ग्रंथपाल डॉ. गोविंद हंबर्डे, प्रा. मुरारी पावडे, प्रा. राहुलकुमार शर्मा यांनीही प्रतिमेस फुले अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमास आकाश तेलंग, डी. एच. शिंदे आदींचे सहकार्य मिळाले. यावेळी प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# भाजयुमोच्या तालुका उपाध्यक्षपदी कोंडीबा सूर्यवंशी यांची निवड

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –तालुक्यातील भाजपाचे कार्यकर्ते कोंडीबा सूर्यवंशी यांच्या कार्याची दखल घेऊन भाजयुम ेच्या तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण, आ. श्रीजयाताई चव्हाण यांचे खंदे समर्थक कोंडीबा सूर्यवंशी यांची भाजप जिल्हाध्यक्ष अॅड. किशोर देशमुख, चेअरमन नरेंद्र चव्हाण, तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे यांच्या सुचनेवरून ही निवड करण्यात आली.

भाजयुमोचे तालुकाध्यक्ष पवन इंगोले यांनी भाजयुमोच्या तालुका उपाध्यक्षपदी कोंडीबा सूर्यवंशी यांची निवड झाली असल्याचे पत्राद्वारे कळविले आहे. या निवडीबद्दल नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, संचालक निळकंठराव मदने, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले.

# जेईई, जेईई-अॅडव्हान्स परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** जेईई, JEE-Advance २०२६ परीक्षा रविवार, दि. १७ मे २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० या कालावधीत नांदेड जिल्ह्यात ४ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत केले आहेत.

या आदेशात नमूद केलेल्या आर.जी.जी. हायटेक डिजीटल झोन/राजीव गांधी कॉलेज कॅम्पस विद्युत नगर नांदेड, आय ऑन डिजीटल झोन विष्णुपुरी नांदेड, एसएसएस इंदिरा इंन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी विष्णुपुरी सहयोग कॅम्पस नांदेड, श्री संभाजी कॉलेज ऑफ फार्मसी शामल एज्युकेशन कॅम्पस देगाव रोड समोर नांदला, दिग्रस, खडकूत या ४ परीक्षा केंद्रांपासून १०० मीटरच्या परिसरात रविवार, दि. १७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंतच्या वेळेत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधित असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच परीक्षेच्या कामाशी संबंधित अधिकारी व कार्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅल्क्युलेटर, ट्रॅन्टीस्टर, रेडिओ, लॅपटॉप, इत्यादी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या ५०० मीटरपर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास तसेच परीक्षा केंद्रात नेण्यास त्याचप्रमाणे सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एस.टी.डी., आय. एस.डी, भ्रमणध्वनी, पेजर, फॅक्स, झेरॉक्स आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास या आदेशाद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे.

**पान १ वरून...**

**भाजप महानगरचे आजपासून...**

यामध्ये 'स्थायी कार्यक्रम-बुथ प्रबंधन मन की बात' या विषयावर भाजपाचे प्रदेश चिटणीस प्रवीण घुगे बोलणार असून, अध्यक्षस्थानी भाजपाचे ज्येष्ठ नेते एल. के. कुलकर्णी राहणार आहेत. सायंकाळी सात ते आठ या वेळेत होणाऱ्या सातव्या सत्रामध्ये भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे हे 'कार्य पद्धती' या विषयावर मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी नांदेड भाजपाचे माजी अध्यक्ष गणपतराव राऊत राहतील. त्यानंतर रात्री ९ ते १० सांस्कृतिक कार्यक्रमाने पहिल्या दिवसाचे सत्र संपणार आहे.

यानंतर दुसऱ्या दिवशी दि. १८ मे रोजी होणाऱ्या सत्राची सुरुवात सकाळी सहा ते सात या वेळेत योग प्रशिक्षक सुरेश लंगडापुरे यांच्या उपस्थितीत योग शिबिराने होईल. सकाळी ९ ते १० या वेळेमध्ये आठवे सत्र होईल. यामध्ये 'हमारा सैद्धांतिक अधिष्ठान' (एकात्म मानव दर्शन सांस्कृतिक राष्ट्रवाद पंच निष्ठाएं) या विषयावर बेटी बचाव बेटी पढावचे राष्ट्रीय संयोजक डॉ. राजेंद्र फडके मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत राहतील. नवव्या सत्राची सुरुवात सकाळी १० ते ११ या वेळेत होईल. यामध्ये 'सोशल मीडिया' (नई तकनीक (एआय) प्रभावी सूचना तंत्र एवं संगठन के लिए सकारात्मक परसेप्शन निर्माण) या विषयावर भाजपाचे सोशल मीडिया प्रदेश सहसंयोजक निखील भामरे बोलणार असून, अध्यक्षस्थानी भाजपाचे ज्येष्ठ नेते जनार्दन ठाकूर राहतील. सकाळी ११ ते १२ दहावे सत्र होईल. 'यात हमारा इतिहास-विकास' या विषयावर खासदार अजित गोपछडे मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी माजी आ. राम पाटील रातोळीकर राहणार आहेत.दोन दिवसीय अभियानचा समारोप दुपारी १२ ते १ या वेळेत होणाऱ्या अकराव्या सत्राने होईल. या सत्रामध्ये 'अपनी सरकारों की गरीब कल्याण योजनाएं और उनके क्रियान्वयन में संगठन की भूमिका' या विषयावर नांदेड महानगर प्रभारी तथा आमदार संभाजी पाटील निलंगेकर मार्गदर्शन करणार असून, अध्यक्षस्थानी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख राहतील.

----------------

**नांदेडहून हिंगोलीमार्गे...**

गाडी क्रमांक १७६६८ लोकमान्य टिळक टर्मिनस-नांदेड एक्सप्रेस : २१ मे २०२६ पासून प्रत्येक गुरुवारी सायंकाळी १६.५५ वाजता सुटेल व पुढील दिवशी ०९.१० वाजता नांदेड येथे पोहोचेल. ही गाडी कल्याण (१७.४५), नाशिक रोड (२०.५३), मनमाड( २२.१०), भुसावळ (००.३०), अकोला (०३.०५), वाशीम (०४.१५), हिंगोली (०५.२५), बसमत (०६.२५) आणि पूर्णा (०७.४५) मार्गे धावेल.

गाडी क्रमांक १७६६५ नांदेड-लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस : २५ मे २०२६ पासून प्रत्येक सोमवारी सायंकाळी २१.१५ वाजता सुटेल व पुढील दिवशी १३.४० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. ही गाडी पूर्णा (२२.१५), बसमत (२३.१५), हिंगोली (००.२५), वाशीम (०१.१५), अकोला (०३.५० ), भुसावळ (०६.००), चाळीसगाव (०७.४०) , मनमाड(०८.५०), नाशिक रोड(०९.४२) आणि कल्याण(१२.३६) मार्गे धावेल.

गाडी क्रमांक १७६६६ लोकमान्य टिळक टर्मिनस-नांदेड एक्सप्रेस : २६ मे २०२६ पासून प्रत्येक मंगळवार दुपारी १६.३५ वाजता सुटेल व पुढील दिवशी सकाळी ०९.१० वाजता नांदेड येथे पोहोचेल.ही गाडी कल्याण(१७.२६), नाशिक रोड(२०.४०), मनमाड(२२.००), चाळीसगाव (२२.४५), भुसावळ(००.३०), मलकापूर (०१.१२), अकोला(०३.०५), वाशीम(०४.१५), हिंगोली(०५.२५), बसमत(०६.२५) आणि पूर्णा(०७.४५) मार्गे धावेल.

या गाड्या बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, भुसावळ, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी आणि कल्याण या प्रमुख स्थानकांवर थांबतील. गाड्यांमध्ये वातानुकूलित, स्लीपर व सामान्य श्रेणीचे आधुनिक एलएचबी डबे उपलब्ध राहतील.

# 'पर्यावरण संरक्षण शपथ' व स्वाक्षरी अभियानाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय रेल्वेमध्ये १५ मे ते ५ जून या कालावधीत हवामान बदल व पर्यावरण संरक्षण या विषयावर आयोजित करण्यात येत असलेल्या जागतिक पर्यावरण दिन अभियानांतर्गत दक्षिण मध्य रेल्वेच्या हज़ूर साहिब नांदेड मंडळातर्फे शुक्रवारी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मंडल रेल व्यवस्थापक कार्यालय हज़ूर साहिब नांदेड येथे पर्यावरण संरक्षण शपथ व स्वाक्षरी अभियान आयोजित करण्यात आले. यामध्ये रेल्वे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून पर्यावरण संरक्षण व शाश्वत जीवनशैली अंगिकारण्याचा संकल्प केला.

यावेळी विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी मंडळ कार्यालयातील उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना पर्यावरण संरक्षणाची शपथ दिली.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात पर्यावरण संरक्षणासाठी शक्य ते सर्व सकारात्मक बदल करण्याची तसेच आपल्या कुटुंबीय, मित्र व इतर नागरिकांना पर्यावरणपुरक सवयी व आचरण स्वीकारण्यासाठी सतत प्रेरित करण्याची शपथ घेतली.

याशिवाय हज़ूर साहिब नांदेड, छत्रपती संभाजीनगर, जालना, नगरसोल, परभणी, पूर्णा, वाशिम आदी रेल्वे स्थानकांवरही पर्यावरण संरक्षणाची शपथ देण्यात आली. यामुळे रेल्वे कर्मचारी व प्रवाशांमध्ये पर्यावरण संरक्षण तसेच हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांविषयी जनजागृती करण्यात आली.

# चंदेरी

## अभिनेत्री निहारिका रायजादाची विशेष मुलाखत

# आजोबांचं नाव न वापरता स्वत:ची ओळख निर्माण करायचीय...

**दिवंगत संगीतकार ओ. पी. नय्यर यांची नात निहारिका रायजादा २०१० मध्ये मिस यूके आणि त्यानंतर मिस इंडिया वर्ल्डवाईड होती. ती लक्झेंबर्गमध्ये लहानाची मोठी झाली. तिने वैद्यकीय शास्त्राचे शिक्षण घेतले, पण २०१३ मध्ये चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. तिचा पहिला बंगाली चित्रपट 'दामोदल' होता. तथापि, 'बेबी' आणि 'मसान' सारख्या चित्रपटांमुळे तिला ओळख मिळाली. २०२५ मध्ये निहारिका 'अद्रिका'मध्ये दिसली आणि या वर्षी एप्रिलमध्ये प्रदर्शित झालेल्या 'मर्सी'मध्ये ती दिसली...**



### मी प्रत्येक अभिनेत्याकडून काहीतरी शिकले...

निहारिका रायजादाने 'मसान', 'बेबी', 'टोटल धमाल' आणि 'सूर्यवंशी' सारख्या चित्रपटांमध्ये काम केले आहे. या चित्रपटांमध्ये मोठ्या कलाकारांसोबत काम करून ती काय शिकली? यावर उत्तर देताना ती म्हणते, मी प्रत्येक अभिनेत्याकडून काहीतरी शिकले. उदाहरणार्थ, ओम पुरीजी एक भावनिक व्यक्ती होते, ते भावनांनी अभिनयही करायचे, त्यामुळे मी त्यांच्याकडून ते शिकले. मी रणवीर सिंगकडून शिकले की अभिनेता होण्यासाठी उत्कटता असली पाहिजे. अक्षय (कुमार) सर प्रत्येकाशी बोलतात, ते खूप मनमोकळे आहेत आणि खूप शिस्तप्रिय देखील आहेत. ते धूम्रपान किंवा मद्यपान करत नाहीत. त्यामुळे, मी त्यांच्याकडून शिस्त आणि शरीर सुस्थितीत कसे ठेवायचे हे शिकले. व्यवसाय, सिनेमा हॉल चालवणे आणि निर्माता-दिग्दर्शक बनणे यासारख्या गोष्टी मी अजय देवगण सरांकडून शिकले.

### ज्येष्ठ अभिनेते आदिल हुसेनजी अप्रतिम आहेत...

निहारिका सध्या 'मर्सी' या चित्रपटातील भूमिकेमुळे चर्चेत आहे. या चित्रपटात ती ज्येष्ठ अभिनेते आदिल हुसेन यांच्यासोबत काम करत आहे. त्यांच्यासोबत काम करण्याच्या अनुभवाबद्दल ती म्हणते, की इतके चित्रपट करूनही नम्र आणि साधे कसे राहायचे, हे मी आदिलजींकडून शिकले. त्यांनी इंग्लिश विंग्लिश आणि लाईफ ऑफ पाय सारख्या सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. पण त्यांना पाहिल्यावर हे स्पष्ट होते की, माणूस जितका उंच जातो, तितका तो अधिक साधा बनतो. ते एक तत्त्वज्ञ आहेत आणि त्यांनी अनेक पुस्तके वाचली आहेत. ते अनेकदा सेटवर ऐनवेळी अभिनय करायचे आणि आदिल सर ज्याला आपण नैसर्गिक अभिनय म्हणतो, तो करतात. खरं सांगायचं तर, ते अप्रतिम आहेत.

### आजोबांच्या नावावर अवलंबून राहिले नाही...

चित्रपटसृष्टीत घराणेशाहीवर नेहमीच चर्चा होते. पण निहारिकाला अजूनपर्यंत अशा संधी मिळाल्या नाहीत. तिने तिच्या आजोबांचे नाव का वापरले नाही? यावर उत्तर देताना निहारिका म्हणते, कारण मला ते नाव वापरण्याची परवानगी कोणीच दिली नाही. मात्र, मी काही खूप चांगल्या दिग्दर्शकांसोबत काम केले आहे आणि मला त्यांचा अभिमान आहे. या इंडस्ट्रीचा भाग असणे हे मी माझे भाग्य समजते; नाहीतर, अनेक लोकांना चित्रपटांमध्ये काम करण्याची इच्छा असूनही संधी मिळाली नसती. चित्रपट कुटुंबातील असणे काही बाबतीत फायदेशीर असले तरी, मला त्याची पूर्ण क्षमता अजून ओळखता आलेली नाही. ती पुढे सांगते, मी मिस इंडिया असल्यामुळे माझ्या करिअरची खरी सुरुवात झाली. मी ऑडिशन दिली आणि मला संधी मिळाली. पण मला 'टोटल धमाल' नक्कीच माझ्या कौटुंबिक पार्श्वभूमीमुळे मिळाला. सुरुवातीला, मी कोणालाही सांगितले नाही की मी चित्रपट कुटुंबातून आले आहे, कारण मला माझी स्वतःची ओळख निर्माण करायची होती.

### इच्छामरणाबाबतचा निर्णय शहाणपणाने घ्यावा...

निहारिका 'मर्सी' या चित्रपटात काम करत आहे आणि अलीकडेच हरीश राणाच्या इच्छामरण प्रकरणाची बरीच चर्चा झाली होती. याबद्दल निहारिकाला काय वाटते? ती म्हणते, की मी इच्छामरणाला चुकीचे मानत नाही. पण माझा ठाम विश्वास आहे की, एखाद्या व्यक्तीची प्रकृती इतकी गंभीर असते की दुसरे कोणतेही पर्याय उपलब्ध नसतात. त्यामुळे ज्याप्रमाणे हरीश राणाचे अन्न काढून घेण्यात आले, त्याचप्रमाणे आमचे न्यायालय आदराने निर्णय घेऊ शकते.



परंतु हा निर्णय अधिकाऱ्यांनी सर्व बाबींचा विचार करून अत्यंत सावधगिरीने आणि विवेकबुद्धीने घेतला पाहिजे.

## अभिनेता आमिर खानची विशेष मुलाखत

# 'नात्यांकडे दुर्लक्ष करू नका, गौरीने प्रेम पूर्ण केलं...

### तीन खान एकत्र येण्याबद्दल म्हणाला...




**बॉलिवूडच्या 'मिस्टर परफेक्शनिस्ट' आमिर खानने जवळपास चार दशकांच्या कारकिर्दीत अनेक ब्लॉकबस्टर चित्रपट दिले आहेत. त्याच्या कामातील बारकाव्यांकडे लक्ष देण्याच्या वृत्तीमुळे त्याला 'परफेक्शनिस्ट' हे टोपणनाव मिळाले आहे. पण जी गोष्ट त्याला इतरांपेक्षा वेगळे ठरवते, ती म्हणजे आपल्या चांगल्या आणि वाईट दोन्ही निर्णयांची जबाबदारी घेण्याची त्याची क्षमता. आमिर त्या काही मोजक्या कलाकारांपैकी एक आहे, जो रुपेरी पडद्यावरील असो किंवा वैयक्तिक आयुष्यातील, आपले यश आणि अपयश दोन्ही स्वीकारतो. 'लाल सिंह चड्ढा'च्या अपयशाची जबाबदारी असो, रीना दत्ता आणि किरण राव यांच्यासोबतचा त्याचा घटस्फोट असो, आपली मुले जुनैद खान, आयरा खान आणि आझाद यांना वेळ देऊ न शकल्याची खंत असो किंवा त्याची प्रेयसी गौरी स्प्रॅटसोबतचे नाते असो, आमिर खान प्रत्येक बाबतीत आपल्या उणिवा मान्य करतो. आमिर खान सध्या त्याच्या 'एक दिन' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. एका विशेष मुलाखतीत आमिर खानने स्वतःशी संबंधित प्रत्येक विषयावर मनमोकळेपणाने भाष्य केले. तो म्हणाला, की आयुष्यात मी शिकलेला धडा हा आहे की आपल्या प्रियजनांकडे कधीही दुर्लक्ष करू नये... तो पूर्ण विश्वासाने सांगतो, की त्याची प्रेयसी गौरीने त्याचे प्रेम 'पूर्ण' केले आहे.**

**प्रश्न : अनेक लोक स्वतःच्या चुका दुसऱ्यांवर ढकलून मोकळे होत असतात, तुम्ही मात्र त्या चुका स्वीकारतात, हे कसे जमते?**

» **आमिर खान :** मी असाच आहे. कारण मला वाटतं, की कोणीही परिपूर्ण नसते. माझ्याकडूनही चुका झाल्या आहेत, पण मी त्यातून शिकण्याचा प्रयत्न केला आहे. जेणेकरून त्या पुन्हा होणार नाहीत. मी माझ्या चुका मान्य केल्या तरच सुधारणा करू शकेन. मी एक साधा माणूस आहे. माझ्या मनात जे आहे ते मी बोलतो. माझ्या आईने मला जे शिकवले, त्याचा माझ्यावर खूप खोलवर परिणाम झाला आहे. आज मी जो काही आहे तो तिच्यामुळेच आहे.

**प्रश्न : अजूनही अशी कोणती एक चूक आहे जी तुम्हाला सुधारायची आहे?**

» **आमिर खान :** अशा अनेक चुका आहेत, फक्त एकच नाही. पण एक चूक आहे जी मला सर्वात जास्त जाणवते, आणि जी मी आधीच सुधारायला सुरुवात केली आहे. मला वाटतं की मी माझ्या जवळच्या नात्यांना खूप कमी वेळ दिला. ३०-३५ वर्षे मी काम, चित्रपट निर्मिती आणि अभिनयाच्या एका प्रकारच्या नशेत होतो. जेव्हा कोविड आला, तेव्हा मला माझ्या आयुष्याचे परीक्षण करण्याची संधी मिळाली. त्यावेळी आम्ही घरी होतो, काम करू शकत नव्हतो. तेव्हा मला जाणवले, की



मी खूप काही गमावले आहे. तो काळ पुन्हा कधीही येणार नाही. मी आता माझ्या नात्यांना पूर्वीपेक्षा जास्त वेळ देतो आणि माझ्यासाठी त्यांचे महत्त्व लक्षणीयरीत्या वाढले आहे. माझे लक्ष आता माझ्या मुलांवर, माझ्या आईवर, माझ्या मित्रांवर आणि माझ्या जवळच्या लोकांवर आहे.

**प्रश्न : तुमच्या मुलांसोबतचे तुमचे नाते आता किती विकसित झाले आहे?**

» **आमिर खान :** ते खूप बदलले आहे. आधीही ते वाईट नव्हते. असे नाही की मी माझ्या मुलांसोबत वेळ घालवला नाही, पण मी त्यांच्याशी जितके खोलवर नाते जोडू शकलो असतो, तितके जोडू शकलो नाही. मी माझ्या दिग्दर्शकांशी नाते जोडले, त्यांची स्वप्ने, भीती आणि असुरक्षितता जाणून, पण मला माझ्या मुलांच्या (जुनेद आणि आयरा) भीती आणि असुरक्षिततेची जाणीव नव्हती. माझे लक्ष माझ्या मुलांवर नव्हते आणि हा केवळ वेळेचा प्रश्न नव्हता, तर माझ्यात मानसिक नात्याची कमतरता होती. आता मी सुधारणा करायला सुरुवात केली आहे.

**प्रश्न : तुमचा जीवनातून मिळालेला धडा काय आहे?**

» **आमिर खान :** माझा जीवनातून मिळालेला धडा हा आहे की तुम्ही तुमच्या जवळच्या नात्यांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. यश येते आणि जाते, पण तुमचे प्रियजनच तुमच्या आयुष्यात आनंद आणि आधार देतात. त्यांच्याकडे कधीही दुर्लक्ष करू नये.

**प्रश्न : आजकाल प्रेमाची व्याख्या 'सिच्युएशनिझम', 'होस्टिंग', 'बेंचिंग' आणि 'जॉम्बिंग' यांसारख्या शब्दांनी केली जाते, तर एके काळी 'मोहब्बत', 'इश्क' आणि 'उन्स' यांसारखे शब्द अस्तित्वात होते. तुमच्यासाठी प्रेम म्हणजे काय?**

» **आमिर खान :** प्रेमाच्या बाबतीत मी जुन्या विचारांचा आहे. माझा शुद्ध प्रेमावर विश्वास आहे. 'डीप लव्ह, जुनूनी, मर-मिटनेवाला प्यार...' मला 'कुछ कुछ होता है', 'मैने प्यार किया', किंवा 'फिफ्टी फर्स्ट डेट्स'ची इंग्रजी आवृत्ती किंवा शाहरुख खानचा 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे' यांसारखे शुद्ध प्रेम दर्शवणारे चित्रपटही आवडतात. मला भावनिक प्रेमकथा आवडतात. आजकाल मी पाहतो की प्रेक्षक हिंसेकडे अधिक झुकत आहेत. त्यांना हिंसक चित्रपट आवडत आहेत. मला 'हृदय पिळवटून टाकणारं, जग जाळून राख करेन' अशा प्रकारचं प्रेमही आवडू लागलं आहे. लोकांना हिंसक प्रेम आवडत आहे. माझ्या लक्षात आलं आहे की, जेव्हा कधी माझी प्रेमकथा येते, तेव्हा ती नेहमीच चुकीच्या वेळी येते. जेव्हा माझा 'कयामत से कयामत तक' हा चित्रपट प्रदर्शित होत होता, तेव्हा हिंसेचं युग होतं; लोकांना ॲक्शन आवडत होती. मी मन्सूरला म्हणायचो, 'आपला चित्रपट कोण बघणार?' आता, जेव्हा 'एक दिन' प्रदर्शित झाला, तेव्हाही 'ॲनिमल' आणि 'धुरंधर'चं युग आहे. गंमत म्हणजे, जेव्हा माझा 'गजनी' प्रदर्शित झाला, तेव्हा प्रेमकथांचं युग होतं.

**प्रश्न : तुम्ही म्हणालात की तुमचा खऱ्या आणि उत्कट प्रेमावर विश्वास आहे, पण गौरी स्प्रॅटला भेटल्याने तुमचा प्रेमाचा शोध पूर्ण झाला का?**

» **आमिर खान :** मी नशीबवान आहे, की मला गौरीचे प्रेम मिळत आहे. ती अप्रतिम आहे. तिच्यासोबत मला खूप शांत आणि समाधानी वाटतं. जरी रीना आणि किरणसोबत माझे खूप घनिष्ठ संबंध होते, तरी गोष्टी तशा पुढे गेल्या नाहीत ही गोष्ट वेगळी आहे. पण गौरीच्या बाबतीत मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो; आम्ही दोघे एकत्र खूप आनंदी आहोत. मला वाटतं की आता माझं आयुष्य पूर्ण झालं आहे.

**प्रश्न : तुमच्या आयुष्यातला तो 'एक दिवस' ज्याने सर्व काही बदलून टाकले, एक महत्त्वाचा टप्पा?**

» **आमिर खान :** जेव्हा मी एका नाटकात काम करत होतो, माझी मुख्य भूमिकाही



नव्हती. ते एक आंतर-महाविद्यालयीन गुजराती नाटक होते, ज्याची तालीम तीन महिन्यांपासून सुरू होती. अंतिम तालमीच्या चार दिवस आधी, एका राजकीय पक्षाने महाराष्ट्र बंदची घोषणा केली. त्यामुळे मी नाटकात सहभागी होऊ शकलो नाही. खरं तर, माझ्या आईने मला जाऊ दिले नाही. दुसऱ्या दिवशी जेव्हा मी तालमीसाठी पोहोचलो, तेव्हा दिग्दर्शक महेंद्र जोशी खूप संतापले होते. ते म्हणाले, 'तू तालमीला का आला नाहीस? आताच्या आता नाटकातून बाहेर जा.' मी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी ऐकले नाही आणि मला नाटकातून काढून टाकले. मी बाहेर जाऊन गवतावर बसलो. मला नाटकातून काढून टाकल्यामुळे खूप वाईट वाटत होते, तेवढ्यात अचानक माझे मित्र, निरंजन थडे आणि बन्सल तिथे आले. निरंजनने माझी बन्सलशी ओळख करून दिली आणि सांगितलं की तो एफटीआयआयमध्ये कॅमेरा वर्क शिकत आहे आणि त्याचा एक डिप्लोमा फिल्मचा प्रोजेक्ट आहे. तू करणार का? मी लगेचच होकार दिला... दुसऱ्या एका विद्यार्थ्याने तो चित्रपट पाहिला आणि मला त्याच्या डिप्लोमा फिल्ममध्ये घेतलं. त्याची फिल्म प्रसिद्ध दिग्दर्शक केतन मेहता यांनी पाहिली. त्यांना वाटलं की मी त्यांच्या 'होली' या चित्रपटासाठी अगदी योग्य आहे. त्यांनी मला 'होली'मध्ये घेतलं. 'होली' पाहिल्यानंतर मन्सूर आणि नासिर साहेबांना वाटलं की ते 'कयामत से कयामत तक' करू शकतात आणि तिथूनच घटनांची एक साखळी सुरू झाली. जर जोशींनी मला त्या नाटकातून काढून टाकलं नसतं, तर आज मी तुमच्यासमोर बसलो नसतो. तो एक दिवस होता ज्याने माझं आयुष्य बदलून टाकलं.

**प्रश्न : आजकाल इंडस्ट्रीमधील टॉक्सिसिटी आणि असुरक्षिततेबद्दल खूप चर्चा होत आहे. तुम्ही जवळपास ४० वर्षांपासून इंडस्ट्रीत आहात. या विषयावर तुम्ही काय म्हणाल?**

» **आमिर खान :** हे काही नवीन नाही. चित्रपट बनायला लागल्यापासून स्पर्धा अस्तित्वात आहे. निरोगी स्पर्धा चांगली असते. जो कलाकार आपल्या प्रवासात समाधानी आणि आनंदी असतो, त्याच्या मनात असे विचार येत नाहीत. ते त्याची पर्वा करत नाहीत. मला इतरांचे काम बघायला आवडते, उदाहरणार्थ, 'मुन्नाभाई एमबीबीएस' आणि 'लगे रहो मुन्नाभाई'मधील संजय दत्तचे काम उत्कृष्ट आणि सहज होते. मी या स्पर्धेत कधीच सामील झालो नाही. पण काही लोक होतात. जगात सर्व प्रकारचे लोक असतात.

**प्रश्न : चित्रपटप्रेमींना वाटते, की तिन्ही खानांची ही शेवटची सुपरस्टार पिढी आहे. तुम्ही तिघे खान एकत्र कधी येणार?**

» **आमिर खान :** लोकांनी आम्हाला इतकं प्रेम दिलं आहे याचा मला आनंद आहे, पण माझा त्यावर विश्वास नाही. असे लोक येतील जे आमच्यापेक्षा चांगले असतील आणि ज्यांची कारकीर्द आमच्यापेक्षा जास्त काळ टिकेल. साहिर साहेब म्हणाले होते, 'मी एक-दोन क्षणांचा कवी आहे, एक-दोन क्षण ही माझी कहाणी आहे, एक-दोन क्षण हे माझं अस्तित्व आहे, एक-दोन क्षण हे माझं तारुण्य आहे. उद्या असे आणखी येतील जे गाण्यांच्या उमलत्या कळ्या तोडतील, जे माझ्यापेक्षा चांगलं बोलतील, जे तुमच्यापेक्षा चांगलं ऐकतील.' मी प्रतिभावान आहे असं मला वाटत नाही, त्यामुळे हा ट्रेंड असाच चालू राहील. आम्ही तिघे एकत्र येण्याबद्दल बोलायचं झालं तर, आम्ही एकत्र एक चित्रपट करण्याबद्दल चर्चा केली आहे. बघूया ते कधी होतं.

## अभिनेत्री मौनी रॉयचा 4 वर्षांतच संसार मोडला!

प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्री मौनी रॉयने आपल्या नवऱ्याला इन्स्टाग्रामवरून अनफॉलो केल्याने दोघांच्या वैवाहिक आयुष्यात वादळ आल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर सुरू होत्या. तिने नवऱ्याबरोबरचे काही फोटोही डिलीट केले होते. याशिवाय मौनीची जवळची मैत्रीण अभिनेत्री दिशा पाटनीने सुद्धा सूरज नांबियारला अनफॉलो केलं होतं. आता या सगळ्या चर्चांदरम्यान अखेर मौनी व सूरज या दोघांनी संयुक्त निवेदन जारी करत 'विभक्त' झाल्याचं जाहीर केलं आहे.

मौनी या निवेदनात लिहिते, की आम्ही सर्वांना एक नम्र विनंती करू इच्छितो की, कृपया आमच्या प्रायव्हसीचा आदर करा. माझ्या किंवा सूरजबाबत कोणत्याही अफवा पसरवू नका. या कठीण काळात तुम्ही आमची प्रायव्हसी जपाल अशी आमची अपेक्षा आहे. सर्व प्रसारमाध्यमांनाही आमची नम्र विनंती आहे की, कृपया हे थांबवा. आम्हाला आमचं आयुष्य जगू द्या. प्रसारमाध्यमांनी आमच्या वैयक्तिक आयुष्यात विनाकारण हस्तक्षेप केला, याबद्दल मला अत्यंत खेद वाटतो. आज मी हे स्पष्ट करू इच्छिते की, आम्ही वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. या कठीण काळातून बाहेर पडण्यासाठी आम्ही दोघंही आवश्यक तो वेळ घेत आहोत. यादरम्यान, माझ्या वैयक्तिक आयुष्याबाबत अनेक तर्क-वितर्क लावले गेले. आता आम्ही परस्पर संमतीने आमच्या आयुष्याचे मार्ग बदलत वेगवेगळ्या वाटांनी पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यातही आमची मैत्री जपण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करू." असं मौनीने तिच्या पोस्टमध्ये लिहिलं आहे. सूरज नांबियारबद्दल सांगायचं झालं, तर तो दुबईमध्ये स्थायिक आहे. सूरज इन्व्हेस्टमेंट बँकर असून तो मूळचा बंगळुरूचा आहे. या जोडप्याने जानेवारी २०२२ मध्ये गोव्यात लग्नगाठ बांधली होती. मल्याळी आणि बंगाली अशा दोन्ही संस्कृतीनुसार या दोघांचा विवाहसोहळा पार पडला होता. दरम्यान, सूरज आणि मौनीची पहिली भेट २०१९ मध्ये झाली होती. तेव्हापासूनच यांच्या लव्हस्टोरीची सुरुवात झाली. मौनी-सूरजने अनेक वर्षे त्यांचं नातं रिव्हिल केलं नव्हतं. जवळपास २-३ वर्षे एकमेकांना डेट केल्यावर या जोडप्याने २०२२ मध्ये लग्नगाठ बांधली. आता लग्नानंतर ४ वर्षांनी दोघंही विभक्त झाले आहेत.

# आंध्र प्रदेशात तिसऱ्या मुलासाठी ३० हजार तर चौथ्या मुलासाठी ४० हजार रुपयांचा प्रोत्साहन भत्ता मिळणार

**विजयवाडा (प्रतिनिधी)** – आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी शुक्रवारी मोठी घोषणा केली आहे. राज्यातील लोकसंख्या कमी होत असल्यानं त्यात वाढ व्हावी म्हणून राज्य सरकारकडून पालकांना प्रोत्साहन भत्ता दिला जाणार आहे. तिसऱ्या मुलाला जन्माला घालणाऱ्यांना ३० हजार रुपयांचा प्रोत्साहन भत्ता दिला जाईल. तर, चौथ्या मुलाला जन्म देणाऱ्यांना ४० हजार रुपयांचा भत्ता दिला जाईल. चंद्राबाबू नायडू यांनी श्रीकाकुलम जिल्ह्यातील नरसण्णपेटा येथे कार्यक्रमात बोलताना यासंदर्भात घोषणा केली. चंद्राबाबू नायडू यांच्या सरकारकडून या योजनेसंदर्भातील सविस्तर नियम आणि अटी येत्या महिन्याभरात जाहीर केल्या जातील.



चंद्राबाबू नायडू म्हणाले, मी एक नवा निर्णय घेतला आहे, आम्ही तिसऱ्या मुलाच्या जन्मानंतर लगचेच ३० हजार रुपये देणार आहोत. याशिवाय चौथ्या मुलाच्या जन्मानंतर लगेचच ४० हजार रुपये मिळतील, हा योग्य निर्णय नाही का? असं नायडू म्हणाले. स्वर्ण आंध्र आणि स्वच्छ आंध्र स्वच्छता कार्यक्रमात नायडू बोलत होते.

चंद्राबाबू नायडू यांनी काही वर्षांपूर्वी लोकसंख्या नियंत्रणाचं समर्थन केलं होतं. मात्र, आता जन्म दर वाढवण्यासाठी समाजानं एकत्र आलं पाहिजे, असं नायडूंनी म्हटलं. चंद्राबाबू नायडू यांनी काही दिवसांपूर्वी दुसऱ्या मुलाच्या जन्मासाठी २५ हजार रुपयांचा प्रोत्साहन भत्ता देण्याची घोषणा केली होती.

चंद्राबाबू नायडू यांनी ५ मार्चला विधानसभेत माहिती देताना म्हटलं होतं की राज्य सरकार दुसऱ्या मुलाला जन्म देणाऱ्या जोडप्यांना २५ हजार रुपयांचा पोत्साहन भत्ता देण्याचा विचार करत आहे. चंद्राबाबू नायडू यांच्या मते, बदलत्या सामाजिक आणि आर्थिक ट्रेंडमधील बदलाचा कुटुंबाच्या आकारावर परिणाम होतं आहे. अनेक जोडपी एका मुलाचा पर्याय स्वीकारत आहेत.

# २० मे रोजी देशभरात मेडिकल सेवा बंद

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्सने २० मे २०२६ रोजी देशभरातील सुमारे १२.४० लाख केमिस्ट दुकाने आणि ड्रग डिस्ट्रीब्यूटर्स बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. ई-फार्मसी, म्हणजेच ऑनलाइन औषध विक्री, मोठ्या प्रमाणातील डिस्काउंट आणि अपुऱ्या नियमनाच्या मुद्द्यावर हा एकदिवसीय बंद पुकारण्यात आला आहे. महाराष्ट्रासह गुजरात, दिल्ली, उत्तर प्रदेश, आसाम, गोवा, नागालँडसह अनेक राज्यांमध्ये या बंदचा मोठा परिणाम जाणवण्याची शक्यता आहे.

ई-फार्मसी प्लॅटफॉर्म्स नियमितपणे काम करत असून, त्यांच्याकडून प्रिस्क्रिप्शनची योग्य तपासणी होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. एआय-जनरेटेड बनावट प्रिस्क्रिप्शन्स, रिपीट प्रिस्क्रिप्शन्स वापरून अँटिबायोटिक्स, ऑपिऑइड्स, सवयी लावणारी औषधे आणि बंदी असलेली औषधेही विकली जात असल्याचा दावा केला जात आहे.



ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर ग्राहकांना मोठ्या प्रमाणात पर्यायी औषधे दाखवली जातात. तसेच एक्सपायरी जवळ आलेली औषधेही विकली जात असल्याचा आरोप आहे. यामुळे अँटिमायक्रोबियल रेझिस्टन्स वाढण्याचा धोका, रुग्णांच्या सुरक्षिततेला धोका आणि बनावट औषधांचा प्रसार होऊ शकतो, अशी माहिती फार्मासिस्ट वैभव उमाळे, श्री मेडिकल, मलकापूर यांनी दिली आहे.

कोविड काळातील तात्पुरते नियम, म्हणजेच G.S.R. २२०(ए) आणि G.S.R. ८१७(ए), अजूनही सुरू ठेवल्याने ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सना फायदा होत आहे, तर पारंपरिक केमिस्टना तोटा सहन करावा लागत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या डीप डिस्काउंटिंगमुळे छोट्या आणि ग्रामीण भागातील केमिस्ट दुकानांचा व्यवसाय बंद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे सुमारे ५ कोटी लोकांच्या उपजीविकेवर परिणाम होईल, असा दावा खजउऊ ने केला आहे. २० मे रोजी बहुतेक रिटेल आणि होलसेल मेडिकल स्टोअर्स बंद राहण्याची शक्यता आहे.

आपत्कालीन आणि क्रिटिकल केअरसाठी काही सरकारी किंवा खासगी रुग्णालयांमधील फार्मसी सुरू राहू शकतात किंवा काही ठिकाणी पर्यायी व्यवस्था केली जाऊ शकते. बीपी, शुगर, थायरॉइड, हृदयरोग यांसारख्या नियमित औषधांवर अवलंबून असलेल्या रुग्णांनी १९ मेपूर्वी आवश्यक औषधांचा साठा करून ठेवावा, असा सल्ला दिला जात आहे.

# बियाण्यांबाबत तक्रारीसाठी आयुक्तालय स्तरावर नियंत्रण कक्ष

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात कृषी निवीष्ठांबाबत तक्रारीसाठी कृषी आयुक्तालयस्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून या ठिकाणी शेतकऱ्यांना व्हॉटस्अप द्वारे किंवा टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदविता येणार असल्याचे कृषी आयुक्तालयाच्या सुत्रांनी सांगितले.

राज्यात आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांची तयारी सुरु झाली आहे. सध्या शेतात मशागतीचे काम पूर्ण करण्यात आले असून काही ठिकाणी शेतकऱ्यांकडून खाताची तसेच बियाणांची खरेदी केली जात असल्याचे चित्र आहे. बियाणे व खते भरून ठेवल्यामुळे पेरणी योग्य पाऊस झाल्यानंतर तातडीने पेरणी करता येणे शक्य होणार आहे. त्यादृष्टीने शेतकऱ्यांनी तयारी चालविली आहे.

दरम्यान, आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभुमावर शेतकऱ्यांना बियाणे, खते व किटकनाशके या निविष्ठांचा वेळेत, गुणवत्तापूर्ण व मुबलक प्रमाणात पुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी कृषि विभागामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी कृषि आयुक्तांनी घेतलेल्या आढावा बैठकीत राज्यातील शेतकरी, वितरक व विक्रेत्यांना क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या विविध अडचणींचे निवारण करण्यासाठी सूचना दिल्या होत्या.त्यानुसार आयुक्तालय स्तरावर विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून शेतकरी, वितरक व विक्रेत्यांसाठी संपर्कासाठी व्हाट्सअप क्रमांक ९८२२४४६६५५ उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच कृषि विभागाचा टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० यावर देखील संपर्क साधता येणार आहे.

यासोबतच बियाणे, खते व किटकनाशकांच्या गुणवत्ता, किंमत, साठेबाजी, लिकींग किंवा इतर संबंधित अडचणी व तक्रारी नोंदवता येतील.

# ‘आरबीआय’ची कारवाई : १५० नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांची नोंदणी रद्द

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – ‘आरबीआय’च्या मोठ्या कारवाईमुळे भारतात खळबळ! १५० नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांची नोंदणी रद्द; सर्वात जास्त कंपन्या ’या’ २ राज्यात

ठइख लींळेप जप छइऋउ : ठइख च्या मोठ्या कारवाईमुळे भारतात खळबळ उडाली आहे. १५० नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांची नोंदणी आयरबीआयने रद्द केली आहे. सर्वात जास्त कंपन्या २ राज्यात आहेत. रद्द केलेल्या संस्थांमध्ये अनेक लहान आणि मध्यम आकाराच्या वित्त आणि गुंतवणूक कंपन्यांचा समावेश आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) १५० बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांची (एनबीएफसी) नोंदणी प्रमाणपत्रे (सीओआर) रद्द केली आहेत. सर्वाधिक कंपन्या दिल्ली आणि पश्चिम बंगालमध्ये नोंदणीकृत आहेत. आरबीआयने नोंदणी रद्द केलेल्या कंपन्यांची यादी प्रसिद्ध केली. या बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी सुमारे ६७ कंपन्या दिल्लीत, तर सुमारे ७५ कंपन्या पश्चिम बंगालमध्ये नोंदणीकृत होत्या. दिल्ली आणि पश्चिम बंगाल व्यतिरिक्त, या यादीत तेलंगणा, कर्नाटक, मध्य प्रदेश, बिहार आणि हरियाणा येथील कंपन्यांचाही समावेश आहे.

आरबीआयने प्रसिद्धीपत्रक जाहीर करत या कारवाईची माहिती दिली. भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम १९३४ च्या कलम ४५-आयए (६) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांची नोंदणी प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली आहेत. रद्द करण्यात आलेल्या संस्थांमध्ये अनेक लहान आणि मध्यम आकाराच्या वित्त आणि गुंतवणूक कंपन्यांचा समावेश आहे. या बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्या कर्ज देणे, भाडेपट्टी, गुंतवणूक आणि संबंधित वित्तीय सेवा देत होत्या. या यादीत तेलंगणा, कर्नाटक, मध्य प्रदेश, बिहार आणि हरियाणा यांसारख्या राज्यांमधील कंपन्यांचाही समावेश आहे. रिझर्व्ह बँकेनुसार, या कंपन्या यापुढे आरबीआय अधिनियम, १९३४ च्या कलम ४५-आय च्या खंड (अ) मध्ये परिभाषित केल्यानुसार बिगर-बँकिंग वित्तीय संस्था म्हणून कोणताही व्यवसाय करू शकणार नाहीत.बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्या वित्तीय संस्था अनेक प्रकारच्या सेवा देतात.

ज्या बँकांप्रमाणेच कर्ज, गुंतवणूक आणि इतर वित्तीय सेवा पुरवतात, परंतु त्यांच्याकडे बँकिंग परवाना नसतो. आरबीआय कायद्यांतर्गत आरबीआयद्वारे त्यांचे नियमन केले जाते. नोंदणी रद्द झाल्यामुळे या कंपन्या यापुढे एनबीएफसी म्हणून कार्यरत राहणार नाहीत. तसेच या कंपन्यांना आरबीआयद्वारे नियंत्रित कोणताही वित्तीय व्यवसाय करता येमार नाही. भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) एनबीएफसींना मोठा दिलासा दिला आहे.

# मुंबई-पुणे ‘मिसींग लिंक’वरील अपघातात ३ ठार

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील नव्याने सुरू करण्यात आलेल्या ‘मिसिंग लिंक’ परिसरा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघात इतका भयानक होता की काही वाहनांचा अक्षरशः चुराडा झाला. या घटनेमुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून पोलिसांनी अपघाताच्या कारणांचा तपास सुरू केला आहे.



प्राथमिक माहितीनुसार, मुंबई-पुणे महामार्गावरील मिसिंग लिंक भागात भरधाव वेगातील बसने तीन खासगी वाहनांना जोरदार धडक दिली. धडकेनंतर महामार्गावर एकच गोंधळ उडाला. काही वाहनांमध्ये प्रवासी अडकून पडले होते. अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले. त्यापैकी दोन जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू असून पोलिसांकडून अधिक माहिती गोळा केली जात आहे.अपघातानंतर घटनास्थळी मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. मिसिंग लिंक परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. हेल्प फाउंडेशनच्या बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत गॅस कटरच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहनांमध्ये अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्याचे प्रयत्न केले. काही काळ चारही लेनवरील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. नंतर पोलिसांनी आणि बचाव पथकांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला केल्यानंतर हळूहळू वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

दरम्यान, या परिसरात अवघ्या चार तासांच्या अंतरात दोन अपघात घडल्याने मिसिंग लिंक मार्गाच्या सुरक्षेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा मार्ग सुरू झाल्यापासून वाहनांचा वेग वाढला असला तरी अतिवेग आणि निष्काळजीपणामुळे अपघातांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र आहे. पोलिसांनी वाहनचालकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले असून अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे.


## जिल्हा परिषद ,नांदेड.
## जि.प.बांधकाम विभाग नांदेड

फोन नं.-०२४६२-२३४०१२
वेबसाईट- www.zpnanded.in
ई मेल –worksdivzpnanded@gmail.com
विभाग –नियोजन
जाक्र/जिपनां/ बांविन/ नियोजन/निविदा/ 113 /२०२६
दिनांक - 11/05/2026

**जिल्हा परिषद नांदेड**
**जिल्हा परिषद,बांधकाम विभाग नांदेड यांचे कार्यालय**

ई- निविदा सूचना क्र. 18 सन 2025 -2026

जिल्हा परिषद,बांधकाम विभाग नांदेड अंतर्गत एकूण 5 कामे कामाची ई निविदा सूचना क्रमांक 18 जिल्हा परिषदेसाठी पात्र नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खुला कंत्राटदार साठी 4 कामाची,सुशिक्षित बेरोजगार अभियंता ( विद्युत ) 1 कामाची असे एकूण 5 कामाची ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत.निविदा संबंधी सर्व आवश्यक कागदपत्र, जाहिरात व निविदा अटी शासनाच्या https:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निविदा समिती जि.प. नांदेड यांनी राखून ठेवला आहे.

कार्यकारी अभियंता
जिल्हा परिषद,बांध.विभाग नांदेड


# केरळममध्ये वाढती उष्णता असूनही ‘हीटवेव्ह’चा इशारा मिळाला नाही; महाराष्ट्र, एमपी-यूपीमध्ये पारा ४५° पार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारतीय हवामान विभाग देशात उष्णतेच्या लाटेचा (हीटवेव्ह) अलर्ट जारी करण्याचे नियम बदलण्याच्या तयारीत आहे. विभागाचे म्हणणे आहे की, सध्याचे नियम देशातील वेगवेगळ्या भागांसाठी, विशेषतः केरळममधील हवामानानुसार प्रभावी नाहीत.

या वर्षी केरळममध्ये तीव्र उष्णता आणि दमटपणा आहे. पहिल्यांदाच कर्नाटक-महाराष्ट्र किनारपट्टीजवळ तयार झालेल्या अँटी-सायक्लोन प्रणालीच्या आधारावर हवामानाचा अंदाज लावावा लागला. केरळममध्ये उष्णतेच्या धक्क्याचे (हीट स्ट्रोक) अनेक रुग्ण आढळले, परंतु सध्याच्या नियमांमुळे उष्णतेच्या लाटेचा इशारा (हीटवेव्ह अलर्ट) जारी करणे कठीण होते. आता खचऊ नवीन नियम तयार करेल, जेणेकरून राज्यांना वेळेवर उष्णतेच्या लाटेचा इशारा देता येईल. यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरणाकडूनही (डिझास्टर मॅनेजमेंट अथॉरिटी) सल्ला घेतला जाईल.

तर, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि विदर्भात आज उष्णतेच्या लाटेचा (हीटवेव्ह) अलर्ट आहे. शुक्रवारी महाराष्ट्रातील अमरावती येथे ४५.६ओउ आणि राजस्थानमधील फलौदी येथे ४४.८ओउ तापमान नोंदवले गेले. झारखंडमध्ये पावसाचा ऑरेंज अलर्ट. बिहारमधील १९ जिल्ह्यांमध्ये, हरियाणामधील ८ जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचा अलर्ट. राजस्थान आणि पंजाबमध्ये पुढील एक आठवडा उष्णतेच्या लाटेचा (हीटवेव) अलर्ट. जम्मू-काश्मीर, हिमाचल आणि उत्तराखंडमध्ये पावसासह गारपीट होण्याची शक्यता आहे. बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, छत्तीसगड आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये पावसासह विजांचा कडकडाट होण्याचा इशारा आहे. राजस्थानमध्ये तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा आहे. रात्रीही उष्ण राहतील. छत्तीसगड, हरियाणा, दिल्ली, मध्य प्रदेश, पंजाब, तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातही उष्णतेची लाट येईल. आसाम, मेघालय, केरळम, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

हवामान विभागाच्या मते, मान्सून नियोजित वेळेपेक्षा ४ दिवस आधी २६ मे रोजी केरळममध्ये पोहोचू शकतो. तथापि, अमेरिकन हवामान संस्था ’नॅशनल ओशनिक अँड टमॉस्फेरिक डमिनिस्ट्रेशन’ (नोआ) नुसार, यावर्षी सुपर अल निनो येणे जवळजवळ निश्चित झाले आहे.


## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधीतास जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार श्रीनिवास नामदेव लांडगे रा. लांडगेवाडी ता. लोहा जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून खालील प्रमाणे जाहीर प्रगटन माझे पक्षकार यांनी सरस्वतीबाई भ्र. ताराचंद मिसे यांच्या मालकी व ताब्यातील शेत मौ. लांडगेवाडी येथील शेत गट नं. 14/1 मधील त्यांच्या मालकीची 11 आर शेत जमीन पुर्ण कायमची खरेदी करण्याचा सौदा / करार माझ्या पक्षकाराने केला असुन करारापोटी काही रक्कम अनामत म्हणुन दिलेली आहे व लवकरच सदरील शेतजमीनीचे नोंदणीक्रत खरेदीखत करून घेण्याचे ठरले आहे. तरी वरील वर्णनाच्या शेतजमीनीचे संबंधी कोणाचा काही आक्षेप / उजर किंवा हित संबंध, मालकी हक्क, देवाणघेवाण कर्ज असतील तर त्यांनी सदर चे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन 8 दिवसाच्या आत लेखी कागदपत्रासह खालील पत्यावर आक्षेप नोंदवावा मुदतीनंतर आलेला आक्षेप स्विकारला जाणार नाही. माझे पक्षकार रितसर रजिस्ट्री करुन घेतील. सबब हे जाहीर प्रगटन.

दि.16/05/2026

मार्फत
अॅड. व्हि.टी.मच्छेवार
मो.नं.9860448685
माऊली निवास शिवकल्याण नगर
लोहा,ता. लोहा जि. नांदेड

जाहिर प्रगटन देणार
श्रीनिवास नामदेव लांडगे
रा. लांडगेवाडी ता. लोहा जि. नांदेड
मो.नं. 9730180788/8999512208

## Change In Name

My old name is **MOHAMMAD RAUFODDIN ABDUL HAFEEZ S/o ABDUL HAFEEZ** Which now I am Changing new Name. **MD. RAUFODDIN M.A. HAFIZ S/o. ABDUL HAFIZ SHAIKH MAHAMAND** Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same.
Sign by- Mohammad Raufoddin Abdul Hafeez
Address- H.No.1.2.24/3, Natkar Galli, Degloor Dist. Nanded Pin No.431717 Mobile No. 9890446030

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - ०२४६२-२३४५०४
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in
नियंत्रण कक्ष क्रं. - ०२४६२-२३४७२०
पोलीस अधीक्षक कार्यालय, वजिराबाद नांदेड-४३१६०१

जा.क्र.पोकनि/उर्जिता कॅन्टीन/भाडेतत्व /डिपॉझीट/निवीदा/२०२६ दिनांक १६/०५/२०२६

**जाहिरात**
**पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड**
**पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड येथील उर्जिता कॅन्टीन भाडे तत्वावर देणे बाबत**

पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड येथील उर्जिता कॅन्टीन ही डिपॉझीट रक्कम घेवुन भाडे तत्वावर देणे करीता निविदा मागविण्यात येत आहे.

१.पोलीस अधीक्षक कार्यालयात उर्जिता कॅन्टीन त्याची साईज १२X२० फुट अंदाजीत त्यामध्ये स्वतंत्र किचन रुम असुन ती भाडेतत्वावर देणे आहे.
२.उर्जिता कॅन्टीन करीता दरमहा रु.१०,०००/- भाडे व डिपॉझीट रक्कम रु.१,००,०००/-राहील.
३.इच्छुक नगरिक किंवा हॉटेल व्यवसाईक यांनी भाडेदर व अनामत रक्कम नमुद करुन निविदा एक स्वतंत्र बंद पाकिटात सादर कराव्यात.
४.निवीदा हॉटेल चालविण्याचे परवान्यासह ईतर आवश्यक कागदपत्रासह सादर कराव्यात.
५.निवीदा दिनांक १८/०५/२०२६ ते २६/०५/२०२६ पावेतो पोलीस अधीक्षक,नांदेड यांचे नावे आवक शाखा,पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड येथे कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील.
६.निविदा दिनांक २९/०५/२०२६ रोजी वेळ सकाळी ११.०० वा.पोलीस अधीक्षक,नांदेड यांच्या कक्षात पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड येथे उघडल्या जातील.
७.सदर निविदा मंजुर करण्याचा किंवा मंजुर झाल्यानंतर, कारण न दर्शविता कोणत्याही क्षणी रद्द किंवा फेरबदल करण्याचा संपुर्ण अधिकार मा.पोलीस अधीक्षक,नांदेड यांचेकडे राखीव असेल.
८.निविदा सादर करण्यास काही अडचण उद्भवल्यास किंवा अधिक माहिती पाहिजे असल्यास पोलीस निरीक्षक,पोलीस कल्याण विभाग,पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड यांचेशी संपर्क साधावा.

**टिप :-** (या कार्यालयाकडुन निश्चित केलेल्या दरा प्रमाणे कॅन्टीन ची सुविधा उपलब्ध करुन दयावी लागेल.)

(अबिनाश कुमार)
पोलीस अधीक्षक नांदेड

**रामबाण ईलाज**
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७९१७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# जरांगे पाटील यांनी पुकारलेल्या आंदोलनाला नांदेड जिल्ह्यातून हजारो मराठा बांधव जाणार

**नांदेड (प्रतिनिधी)** –मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी या ठिकाणी दि. १६ रोजी अतिशय महत्त्वपूर्ण बैठक बोलावली होती. या बैठकीला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, नांदेड जिल्ह्यातून अनेक मराठा बांधव या बैठकीसाठी उपस्थित होते. या सर्वांच्या साक्षीने मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी येत्या काळामध्ये मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी मोठे आंदोलन उभा करण्याचे घोषित केले आहे.

मराठा समाजाला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता ८ महिने उलटून गेली तरी पूर्तता नाही म्हणून सर्व प्रसारमाध्यमाच्या आणि समाजबांधवांच्या उपस्थितीमध्ये शनिवारी केलेली घोषणा समाज हितावह राहणार आहे. दि. ३० मे रोजी पुकारण्यात आलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील घराघरांतून मराठा समाजाने मोठ्या ताकदीने उपस्थित राहावे, असे आवाहन जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटीतून केले आहे. या आंदोलनाच्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यातसुद्धा जय्यत तयारी करण्यात येत असून, गावोगाव बैठका घेऊन समाज जागृती करणे किंवा



विविध प्रसार माध्यमांतून आंदोलनाची तयारी सुरू केली आहे, असे नांदेड जिल्ह्याचे मराठा सेवक श्याम पाटील वडजे यांनी सांगितले की, शनिवार, दि. ३० मे रोजी समाजाच्या हितासाठी नांदेड जिल्ह्यातील मराठा बांधवांनी कंबर कसली असून, येत्या काळामध्ये सदरील जनांदोलनाला खूप मोठ्या प्रमाणामध्ये प्रतिसाद मिळणार आहे.

जरांगे पाटील यांनी पुकारलेल्या मुंबई आंदोलनात सरकारने शासन अध्यादेश तर दिला, परंतु अध्यादेशाची सविस्तर अंमलबजावणी केली नाही. मराठा समाजातील अनेक बांधवांना त्या शासन अध्यादेशानुसार मराठा कुणबी जात प्रमाणपत्र वितरित केले जात नाही, सारथीसह अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला निधी उपलब्ध नाही, यासह मराठा समाज बांधवांवर दाखल करण्यात आलेले काही गुन्हे अजूनही सरकारने मागे घेतले नाहीत, मराठा आरक्षणासाठी ज्या कुटुंबाने आत्मबलिदान दिले त्या कुटुंबातील एका सदस्याला महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ किंवा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ या दोन ठिकाणी शासन अध्यादेश काढल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत शासकीय नोकरीत समावेश करून घेण्याचे लेखी आश्वासन सरकारने दिले होते, परंतु अजूनही अनेक कुटुंब या विषयापासून वंचित आहेत या सर्व मागण्यांची पूर्तता केली नसल्यामुळे मनोज जरांगे पाटील यांना आंदोलन करण्याची वेळ आली आहे, अशा तीव्र भावना आज समाजातून व्यक्त होत आहे, अशी प्रतिक्रियाही श्याम पाटील वडजे यांनी दिली.

# अवैध दारूची चोरटी वाहतूक; दोघांना अटक; साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– देशी दारूची चोरटी वाहतूक करणाऱ्या दोन आरोपींना शहरातील पावडेवाडी नाका रस्त्यावर अटक करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत स्विफ्ट कंपनीच्या कार व अवैध दारू असा ५ लाख ३९ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील अवैध व्यवसायावर प्रतिबंध घालण्यासाठी ऑपरेशन क्रॅकडाऊन अंतर्गत अवैध व्यवसायावर कारवाई करण्यात येत आहे. या अंतर्गत स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे आपल्या पथकांना कारवाई करण्याबाबत आदेशीत केले.



दि. १५ मे रोजी सपोनि वसंत आरसेवार यांच्या पथकातील अंमलदारास गणेशनगर वाय पॉईंट ते पावडेवाडी नाका दरम्यान काहीजण चोरटी विक्री करण्यासाठी अवैध देशी दारू घेऊन जात असल्याची माहिती मिळाली. यानुसार पथकाने पावडेवाडी नाका दरम्यान एका रुग्णालयासमोरील रस्त्यावर सापळा लावून स्विफ्ट डिझायर कार (एमएच २६ एएफ २०४५) ही पकडण्यात आली. यात आरोपी अक्षयकुमार दिगंबरराव शंकपाळे (वय ३३) व रोहन गौतम कांबळे (वय २७ रा. दोघे आंबेडकर नगर, नांदेड) यांना ताब्यात घेऊन कारची तपासणी केली. कारच्या डिक्कीमध्ये २० हजार २०० रुपयांचे देशी दारूचे बाक्स आढळून आले. हा मुद्देमाल स्विफ्ट डिझायर कारसह ५ लाख ३९ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या दोघांना मुद्देमालासह शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# विमानतळ ठाण्याच्या हद्दीतील टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरात तसेच जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यातील गुन्हे अभिलेखावरील सक्रिय तसेच वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत आरोपींची यादी २+ स्किम अंतर्गत तयार केली. या यादीनुसार आरोपी विरुद्ध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंबंधाने सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारांवर वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करून देखील त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेदारांकडून सराईत गुन्हेगारांवर उचित प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.

पोलीस स्टेशन विमानतळ हद्दीत खालील आरोपीतांनी दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी अग्नीशस्त्र, जिवंत काडतूस, शस्त्र व दरोडा टाकण्यासाठी कामी येणारे इतर साहित्य ताब्यात बाळगून दरोड्याच्या तयारीत असताना मिळून आले. त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन विमानतळ, नांदेड येथे १८२/२०२६ कत्तम ३१०(४), भारतीय न्याय संहिता सहकलम ३/२५,४/२५, शस्त्र अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल आहे. गुन्ह्यातील आरोपी हे स्वतःच्या आर्थिक लाभापोटी संघटित गुन्हे करीत असल्याने सदर टोळीने एकापेक्षा अधिक गुन्हे संघटितपणे केलेले असून, टोळी प्रमुख याचे विरोधात संबंधित न्यायालयात एकापेक्षा अधिक दोषारोपपत्र दाखल असून, त्यांची न्यायालयाने दखल घेतलेली आहे. त्यांच्या विरुद्ध असलेल्या गुन्ह्यांत न्यायालयाने दखल घेतल्यानंतरही न्यायालयाने केलेल्या कार्यवाहीचा कोणताही परिणाम त्यांच्यावर झाला नसल्याचे दिसून येते. सदर आरोपीतांनी त्यांच्या विरुध्द दाखल गुन्ह्यांतून जामिनावर सुटून आल्यानंतर ते आपल्या संघटित साथीदारांसह पुन्हा संघटित होऊन, गंभीर स्वरुपाचे दखलपात्र गुन्हे करण्याचे सवयीचे सराईत गुन्हेगार आहेत. यातील आरोपी (टोळी प्रमुख व टोळी सदस्य) यांच्यावर नांदेड जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

या संघटित गुन्हेगारांच्या कृत्यामुळे सर्वसामान्य जनतेचे जनजीवन विस्कळीत होत असून, सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका निर्माण होत आहे. टोळीचे कार्यक्षेत्र व्यापक असून, त्यांच्या हालचालींवर बारकाईने नजर ठेवून, त्यांचे आश्रयस्थान शोधणे व गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध करणे आवश्यक आहे. उक्त पार्श्वभूमीवर या संघटित टोळीच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायांवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांना भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १११ प्रमाणे प्रतिबंध करणे अत्यंत आवश्यक असल्याने सदर नमूद गुन्ह्यात उक्त कलमाचा अंतर्भाव करुन तपास करण्याकरिता प्रस्ताव पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन विमानतळ, नांदेड यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे सादर केला होता. त्या अनुषंगाने अबिनाश कुमार यांनी या गुन्ह्यात भारतीय न्याय संहिता कलम १११ प्रमाणे वाढ करून तपास करण्याची परवानगी दिली असून गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे करीत आहेत. ज्या कारवाईमध्ये अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने, स्थानिक गुन्हे शाखेचे अतुल भोसले यांनी लक्ष घातले होते.

आरोपींमध्ये राहुल नागनाथ काळे, वय २७ वर्षे, व्यवसाय बेकार, रा. साठे चौक खोब्रागडे नगर नांदेड, योगेश ऊर्फ गोट्या चंदर सोनकांबळे, वय २६ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. हर्षनगर नांदेड. राम ज्ञानेश्वर कांबळे, वय २१ वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. चिखलवाडी मुदखेड, जि. नांदेड, श्रावण रामजी जोंधळे, वय ३१ वर्षे, व्यवसाय चालक, रा.नवीन आबादी, मुदखेड जि. नांदेड, मनोज साहेबराव कदम, वय २९ वर्षे, व्यवसाय मजुरी रा. मगनपुरा, नवीन मोंढा नांदेड, राम मरीबा देवकर वय २९ वर्षे व्यवसाय-मजुरी रा. अण्णाभाऊ साठे चौक नांदेड, संतोष ऊर्फ चिप्पा पि. साईनाथ तरटे वय २४ वर्षे व्यवसाय बेकार रा. खोब्रागडे नगर नांदेड.

# अंध महिलेचे चोरलेले मंगळसूत्र एका महिलेकडून जप्त

**नांदेड (प्रतिनीधी)**– सिडको परिसरातील अंध दाम्पत्याचा गैरफायदा घेत मंगळसूत्र चोरी करणाऱ्या एका महिला आरोपीस नांदेड ग्रामीण पोलिसांनी अवघ्या दोन तासांत अटक केली. विशेष म्हणजे, गुन्हा दाखल झाल्यानंतर केवळ १२ तासांच्या आत आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, चोरी गेलेला मुद्देमाल जप्त करून पीडित महिलेला परत करण्यात आला आहे.

दि. १३ मे २०२६ रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या सुमारास सिडको परिसरात अंध महिला घरासमोर बसून केस विंचरत होती. त्यावेळी त्यांनी गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र काढून बाजूला ठेवले होते. या परिस्थितीचा फायदा घेत अज्ञात महिलेने



सुमारे २ ग्रॅम वजनाचे व अंदाजे २० हजार रुपये किंमतीचे मंगळसूत्र चोरून नेले.

दि. १५ मे रोजी सायंकाळी ५.४१ वाजता नांदेड ग्रामीण ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार गुन्हा क्रमांक ५५८/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर आणि गुन्हे शोध पथकातील उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड, सपोउपनि रामकिशन मोरे तसेच अंमलदार अनुराग मुळे, संतोष पवार, असीफ अली, गवेंद्र सिरमलवार व विष्णू कल्याणकर यांनी तातडीने तपास सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून पोलिसांनी अवघ्या दोन तासांत आरोपी महिलेला ताब्यात घेतले.

# गुरुद्वारा साहिबचे नाव व छायाचित्रांचा व्यावसायिक गैरवापर न करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील गुरुद्वारा साहिबचे नाव आणि छायाचित्रांचा काही व्यावसायिक अनधिकृतपणे गैरवापर करीत आहेत. हा प्रकार पूर्णपणे चुकीचा असून धार्मिक भावनांशी खेळणारा आहे. तेव्हा हा गैरवापर थांबविण्याची मागणी भाविकांनी केली आहे.

'तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिब' हे जगभरातील शीख धर्मीयांचे सर्वोच्च श्रद्धास्थान आहे. दहावे गुरु, श्री गुरु गोविंदसिंघजी महाराज यांचे पावन निर्वाण स्थान म्हणून या पवित्र भूमीला देश-विदेशात महत्व आहे आणि याचाच फायदा काही व्यावसायिक घेत आहेत.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सर्व व्यक्ती, संस्था आणि सोशल मीडिया वापरकर्त्यांनी तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिबचे नाव किंवा फोटो कोणत्याही व्यावसायिक जाहिरातीसाठी वापरणे त्वरित थांबवावे. ज्यांनी असा वापर केला आहे, त्यांनी तो मजकूर त्वरित हटवावा.

या सूचनेनंतरही जर कोणी गुरुद्वारा साहिबच्या नावाचा किंवा फोटोंचा /इतिहासाचा गैरवापर करताना आढळल्यास किंवा त्यासंदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास, संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे या पत्रकात म्हटले आहे.

# प्रल्हाद खंडागळे यांचे निधन

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –



तालुक्यातील दाभड येथील ज्येष्ठ नागरिक प्रल्हाद गवणाजी खंडागळे यांचे शनिवार, दि. १६ रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गावातील स्मशानभूमीत सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रल्हाद खंडागळे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते रामदास खंडागळे, ओमप्रकाश खंडागळे यांचे वडील होत.

# शनी अमावस्येनिमित्त शनिमंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – हडको येथील श्री शनी मंदिर व संकटमोचन हनुमान मंदिर देवस्थान येथे शनिवार, दि. १६ मे रोजी योग त्रिकुट पर्व काळ योग श्री शनी जयंतीच्या शनि अमावास्येच्या निमित्ताने १६ मे रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पंतप्रधान टीबी मुक्त भारत अभियानाद्वारे राष्ट्रीय क्षयरोग दुर्रीकरण कार्यक्रम मनपा नांदेड अंतर्गत घेण्यात आला. तसेच महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हडको येथील श्री शनिदेव व श्री संकट मोचन हनुमान मंदिर देवस्थान श्री शनिदेव जयंती सोहळानिमित्त दि.१६



मे रोजी सकाळी महाअभिषेकासह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी गोळवलकर गुरुजी रक्त पेढीचे रक्तदान शिबीर सकाळी ८ ते १२ दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. १६ मे रोजी सकाळी ६.३० वाजता ५१ किलो तेलाचा अभिषेक, हनुमान चालीसा, शनि चालीसा, आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी शनिदेवतेचा ५१ किलो तेलाचा सामुदायिक अभिषेक गुरु शशिकांत कुलकर्णी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी आजीवन अन्नदात्यांसह ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक यांची उपस्थिती होती व पंतप्रधान टीबीमुक्त भारत अभियानाद्वारे राष्ट्रीय क्षयरोग दुर्रीकरण कार्यक्रम मनपा नांदेड अंतर्गत श्री शनिमंदिर सिडको येथे आयुष्यमान १०० डे टीबी कॅम्पियन दुसरा फेज, कार्यक्रमातून आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, आरोग्य उपायुक्त अजितपाल संधू, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिठे, डॉ. मोहम्मद बदीयोद्दिन यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमासाठी नगरसेविका सौ. सुवर्णा बसवंदे, करणसिंह ठाकूर, डॉ. मोहम्मद बदीओदिन, डॉ, बळीराम भुरके, डॉ, संतोष शिंदे, डॉ, मनीषा बदने, डॉ, संध्याराणी, संजय जाधव आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

# चंपतराव हुस्सेकर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – लोहा



तालुक्यातील पोखरी येथील ज्येष्ठ नागरिक चंपतराव गोपिराज पाटील हुस्सेकर यांचे वयाच्या १०५ व्या वर्षी राहत्या गावी निवासस्थानी दि. शुक्रवार, दि. १५ मे रोजी निधन झाले.

त्यांच्या पार्थिव देहावर १६ मे रोजी पोखरी या गावी दुपारी ३ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले असून, त्यांचा पश्चात, एक मुलगा, दोन मुली, नातू, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते आनंद पाटील म्हस्के यांचे ते आजोबा होत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आज बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)**– दरवर्षीप्रमाणे यंदाही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त नांदेड शहरात विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने रविवार, दि. १७ मे रोजी सायंकाळी ६ वाजता शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.



लोककल्याणकारी व न्यायप्रिय राज्यकर्त्या म्हणून ओळख असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा वारसा समाजापर्यंत पोहोचविणे तसेच जयंती उत्सव भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याच्या उद्देशाने ही बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या बैठकीस सर्व समाजबांधव, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच जास्तीत जास्त अहिल्याप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन गोविंद गोरे, पंढरी जायनुरे, प्रदीप सरोदे, भास्कर तळणे, नवनाथ काकडे, दीपक तुडमे, विठ्ठल काळे, शिवकुमार देवकते, गजानन सरोदे, प्रेम देवदे, श्रीहरी मुंडकर आदींनी केले आहे.

# 'स्वारातीम' विद्यापीठातील 'स्पोर्ट्स फिटनेस समर कॅम्प २०२६'चा समारोप

**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या 'स्पोर्ट्स फिटनेस समर कॅम्प २०२६'चा उत्साहात समारोप झाला. विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि फिजिकल एज्युकेशन फाऊंडेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ ते १५ मे २०२६ या कालावधीत हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या उन्हाळी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच क्रीडा कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात आला. शिबिरात ॲथलेटिक्स, व्हॉलीबॉल, खो-खो, क्रिकेट, कबड्डी, बास्केटबॉल आणि हॉकी यांसारख्या मैदानी खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच जिम्नॅस्टिक्स, टेबल टेनिस, बॅडमिंटन, एरोबिक्स, बॉक्सिंग, योगा, वेटलिफ्टिंग आणि फिजिकल फिटनेस यांचेही प्रशिक्षण सहभागी विद्यार्थ्यांना देण्यात आले.

शिबिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सहभागी खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाची भव्य क्रीडांगणे आणि आधुनिक इनडोअर स्टेडियमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. राष्ट्रीय स्तरावरील अनुभवी प्रशिक्षक व तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व



मार्गदर्शन केले. तसेच सहभागींसाठी मोफत बससेवा आणि टी-शर्टची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली होती.

५ ते १८ वर्षे वयोगटातील एकूण ७० मुले व मुलींनी या शिबिरात सहभाग घेतला. उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग करीत मुलांच्या शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच क्रीडा कौशल्य विकसित करण्यासाठी हे शिबीर उपयुक्त ठरल्याची भावना अनेक पालकांनी व्यक्त केली.

यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहून खेळ, व्यायाम आणि योगाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. निरोगी शरीरासाठी नियमित खेळणे आणि योगाभ्यास आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. समारोप कार्यक्रमास क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, नॅक सेलचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, डॉ. चैतन्य, डॉ. कुलजीत राणा आणि डॉ. पारस यादव उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. विजय जाधव, पुनम यादव, संजयसिंह ठाकूर, शिवाजी हंबर्डे, सुनील लुटे, परमजोतसिंग सिद्धू आणि रतनसिंग पुजारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com